cmyk

## संपादकीय

### उपयुक्तता आणि उपद्रवमूल्य

राजकारणात तुम्हाला वारंवार तुमची उपयुक्तता सिद्ध करावी लागते. ज्यावेळी तुमची उपयुक्तता संपते त्यावेळी तुम्हाला संपवण्यासाठी तुमचे विरोधक आणि मित्र म्हणून वागवणारे तुम्हाला संपवतात. उपयुक्तता संपली की उपद्रव मूल्य हे हत्यार बाहेर काढावे लागते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गत अशीच झाली आहे. एक वेळ त्यांना डोक्यावर घेणारे भाजपवाले आता त्यांची शक्ती क्षीण करण्याच्या मागे लागले आहेत.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२६६ | शुक्रवार दि.२३ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### झारखंडमध्ये ११ नक्षलींचा खात्मा

चाईबासाः झारखंडमध्ये चकमकीत ११ हून अधिक नक्षलवादी ठार झाले आहेत. पश्चिम सिंहभूम जिल्ह्यातील सारंडा जंगलात गुरुवार सकाळपासून सुरक्षा दल आणि भाकपा (माओवादी) नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. मात्र, अद्याप याची अधिकृत पुष्टी झालेली नाही. गुरुवारी पहाटे चकमक सुरू झाली. आसपासचा परिसर गोळीबाराच्या आवाजाने दणाणून गेला. मिळालेल्या माहितीनुसार, झारखंड पोलीस, कोब्रा आणि सेंट्रल पोलीस फोर्सच्या जवानांच्या शोधमोहिमेदरम्यान १ कोटी रुपयांचे बक्षीस असलेल्या नक्षलवादी अनल दाच्या पथकाशी चकमक झाली. त्याच्या पथकात १४ हून अधिक नक्षलवादी आहेत. सतत सुरू असलेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी ११ हून अधिक नक्षलवाद्यांना ठार केले आहे. १ कोटी रुपयांचे बक्षीस असलेला नक्षलवादी अनल दा देखील मारला गेल्याचे सांगितले जात आहे.

### जम्मू काश्मीरमधील अपघातात १० जवान शहीद

श्रीनगरः जम्मू काश्मीरमधील दोडा जिल्ह्यातील भादरवाह भागात भारतीय सैन्याची गाडी २०० फूट दरीत कोसळून १० जवान शहीद झाले आहेत. या अपघातात अनेक जवान जखमी देखील झाले आहेत. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार १७ जवानांना घेऊन जाणारी भारतीय लष्कराची बुलेट प्रुफ गाडी ही उंचावरील पोस्टकडे चालली होती. त्यावेळी चालकाचा गाडीवरील ताबा सुटला आणि गाडी २०० फूट खोल दरीत कोसळळी. दरम्यान, या दुर्घटनेची माहिती मुळताच लष्कराची आणि पोलिसांच्या टीमने त्वरित मदत कार्य सुरू केलं. स्थानिक लोकांनी देखील पोलीस आणि रेस्क्यू टीमला मदत केली. बचाव कार्यादरम्यान, १० जवानांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. तसेच जखमींना देखील बाहेर काढण्यात आलं. त्यांना गंभीर स्थितीत रूग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्यांना हेलिकॉप्टरमधून उधमपूरच्या कमांड रूग्णालयात दाखल करण्यात आले असून तिथे त्यांच्यावर विशेष उपचार सुरू आहेत.

### सोनं ४ हजार रुपयांनी तर चांदी २० हजारांनी स्वस्त

मुंबईः सोने आणि चांदीच्या दरात गेल्या काही दिवसांपासून जोरदार तेजी सुरु होती. दररोज सोने आणि चांदीचे दर नवे उच्चांक गाठत होते. अखेर गुरुवारी मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोने आणि चांदीच्या दरात घसरण झाली आङे. चांदीचे दर २० हजार रुपयांनी कोसळले. तर, सोन्याचेदर ४ हजार रुपयांनी कमी झाले आहेत. चांदीच्या ५ मार्चच्या एक्सपायरीच्या वायद्याचे दर बुधवारी ३२५६०२ रुपयांवर पोहोचले होते. त्यात गुरूवारी १९८४९ रुपयांची घसरण होऊन ते ३०५७५३ रुपयांवर पोहोचले. सोन्याच्या दरात देखील घसरण झाली आहे. सोन्याचे दर ४०८५ रुपयांनी कमी होऊन १ लाख ४८ हजार ७७७ रुपयांवर आले आहेत. सोने आणि चांदीच्या दरातील घसरणीचे प्रमुख कारण डोनाल्ड ट्रम्प यांचे ग्रीनलँड आणि यूरोप संदर्भातील बदललेले धोरण कारणीभूत आहे.

### फक्त ६५ दिवसांत दाम्पत्याचा घटस्फोट मंजूर

दिल्लीः लग्नानंतर फक्त ६५ दिवस एकत्र राहिले, त्यानंतर १० वर्षे एकमेकांपासून वेगळे राहिले आणि एकमेकांविरोधात कोर्टात खटले दाखल केले अशा एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने लग्न टिकू शकत नाही असे म्हणत घटस्फोट मंजूर केला आहे. या प्रकरणात न्यायालयाने "विवाह पूर्णपणे अपयशी" झाल्याचे मान्य करत संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत विशेष अधिकार वापरून हा निर्णय दिला. संबंधित दाम्पत्याचे लग्न २८ जानेवारी २०१२ रोजी झाले होते. मात्र लग्नानंतर अवघ्या ६५ दिवसांतच दोघांमध्ये वाद सुरू झाले आणि त्यानंतर अनेक वर्षे हे दोघे वेगळे राहू लागले. यावेळी न्यायालयाने एक महत्त्वाची टिप्पणी करत म्हटले, आजकाल तरुण जोडप्यांमध्ये सहनशीलता कमी झाली आहे आणि अहंकार वाढला आहे.

# बदलत्या वातावरणाचा पिकांवर परिणाम

## विविध रोगाचा प्रादुर्भाव; शेतकऱ्यांचा खर्च वाढला

पुणे । प्रतिनिधी

**बदलत्या वातावरणामुळे प्रमुख पिके असलेल्या कांदा, गहू, हरभऱ्यावर मावा आणि करपा रोगाचा, तर द्राक्ष पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. रोगांचा फैलाव रोखण्यासाठी औषध फवारणीचे प्रमाण वाढल्याने शेतकऱ्यांच्या खिशाला आर्थिक झळ बसू लागली आहे.**



दिवसभर ढगाळ वातावरण आणि सकाळी – संध्याकाळी थंडी या बदलत्या वातावरणामुळे प्रमुख पिके असलेल्या कांदा, गहू, हरभऱ्यावर मावा आणि करपा रोगाचा, तर द्राक्ष पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. यंदा पावसाचे प्रमाण जास्त राहिल्याने शेतकऱ्यांनी गहू, कांदा, हरभरा यासह भाजीपाला व इतर नगदी पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली आहे. नोव्हेंबर, डिसेंबर व जानेवारी महिन्यात तीव्र थंडी जाणवत होती. मात्र, अलीकडे अचानक हवामानात बदल होऊन थंडी कमी झाली आणि ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. या बदलामुळे पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. पाणीसाठा मोठ्या प्रमाणावर असल्याने बाष्पीभवन पान २ वर

### या पिकांवर अधिक परिणाम

कांदा, गहू व हरभरा या तीन पिकांसाठी थंडी अधिक पोषक मानली जाते. मात्र, अलीकडे वातावरणात अचानक झालेला बदल आणि वाढलेले ढगाळ वातावरण यामुळे कांदा, गहू, हरभरा तसेच भाजीपाला पिकांवर मावा व करपा रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. परिणामी, औषध फवारणीचा खर्च वाढून शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे.

# राज्यातील २९ महापालिकांच्या महापौरपदासाठी आरक्षण सोडत जाहीर

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील महानगरपालिकांसाठी गुरूवारचा दिवस अत्यंत निर्णायक ठरला आहे. महापालिका निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर आता महापौरपदावर नेमके कोण बसणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहें. त्यावर मोठा निर्णय झाला असून राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौरपदासाठी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे.**

ही सोडत मंत्रालयात जाहीर करण्यात आली. त्यामुळे आता कोणत्या महापालिकेत कोणत्या प्रवर्गाला महापौरपद मिळणार, हे स्पष्ट झाले आहे. यामध्ये




मुंबई महापालिकेच्या महापौरपदाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. जाहीर झालेल्या सोडतीनुसार अनुसूचित जमाती १ जागा तर ३ महापौरपदे अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहेत. यामध्ये महिला आणि पुरुष आरक्षणाचा समावेश राहणार आहे. नागरिकांचा मागास प्रवर्गसाठी (ओबीसी) ८ जागा आहेत. उर्वरित १७ महापौरपदे सर्वसाधारण पान २ वर

### आरक्षणात फिक्सिंग – विरोधक

मुंबईच्या महापौर आरक्षणावर ठाकरे गटाच्या किशोरी पेडणेकर तर नागपूरमध्ये भाजपसाठी महापौर आरक्षण सोडत सोयीने काढल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. या प्रकरणामुळे महापौर आरक्षणाचा मुद्दा अधिकच तापण्याची चिन्हे आहेत. अनेक महापालिकांमधील महापौर आरक्षणाच्या सोडतीवर विरोधकांनी आक्षेप घेतला आहे. इतर महापालिकांसाठी जी पद्धत अवलंबली त्यातून मुंबईला का बाहेर काढण्यात आले? असा सवाल शिवसेनेच्या (ठाकरे) गटनेत्या किशोरी पेडणेकर यांनी विचारला आहे. तर महापौर आरक्षण फिक्स असून याविरोधात मित्र पक्षासह न्यायालयात जाण्याचा इशारा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी नागपूर येथे पत्रकारांशी बोलताना दिला आहे.

### मराठवाड्यात पाच पैकी चार ठिकाणी महिलांना संधी

मुंबईत २९ महानगरपालिकेच्या महापौर पदासाटी आरक्षण सोडत निघाली. यामध्ये मराठवाड्यातील पाच महानगरपालिकांचाही समावेश आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर, जालना महानगरपालिका, नांदेड–वाघाळा, परभणी आणि लातूर महापालिकेचा समावेश आहे. सोडतीत मराठवाड्यातील महानगरपालिकेवर महिला राज आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आता महापौर पदाची लॉटरी कुणाला लागते याची चर्चा सुरू झाली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वसाधारण प्रवर्गातील महिला या महापौर पदी असेल. तर नांदेड–वाघाळा या महानगरपालिकेतही खुल्या प्रवर्गातील महिलेला महापौर पदाची संधी मिळाली आहे. जालना महापौरपद हे एससी महिला प्रवर्गासाठी राखीव झाले आहे. तर लातूर महापालिकेचे आरक्षण हे एससी महिला प्रवर्गासाठी सुटले आहे. इथे काँग्रेस आणि वंचित हे पक्ष दावेदार हे ठरवतील.

# बीडमधील व्यापाऱ्यावर जीएसटी पथकाचा छापा

बीड । प्रतिनिधी

छत्रपती संभाजी नगर येथील जीएसटी अधिकाऱ्यांचे पथक आज पहाटेच बीडमध्ये येऊन धडकले. या पथकाने पहाटे पेठ बीड भागातील एका व्यापाऱ्याच्या घरात जाऊन सुरू केली आहे. पहाटेपासून दुपारी दोन वाजेपर्यंत ही झाडाझडती सुरूच होती. घराच्या भिंतीवर १३३ कम्युनिकेशन असा बोर्ड देखील दिसून येत आहे. काही कागदपत्रे देखील तपासण्यात येत असून उशिरापर्यंत ही कारवाई सुरूच होती. दरम्यान पथकाकडून नेमक्या कोणत्या कारणामुळे ही कारवाई सुरू आहे याची माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. पेठ बीड भागातील एका डिजिटल प्रिंटिंग व्यवसायाशी संबंधित असलेल्या व्यापाराच्या घरी छत्रपती संभाजीनगर येथील जीएसटी अधिकाऱ्यांचे पथक येऊन धडकले आहे. पहाटेपासून संबंधित व्यापाऱ्याच्या घरात झाडाझडती सुरू असून बाहेर मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. पान २ वर

# जिल्हा परिषद निवडणूक खर्चासाठी ५८ कोटींचा निधी

## मराठवाड्यातील चार जिल्ह्यासाठी १५ कोटी

बीड–संभाजीनगर । प्रतिनिधी

**राज्यातील एकूण बारा जिल्ह्यामध्ये होत असलेल्या जिल्हा, परिषद पंचायत समिती निवडणुकासाठींच्या खर्चासाठी राज्य शासनाने जवळपास ५८ कोटी ७१ लाख ७९ हजार ७४० रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यामध्ये मराठवाड्यातील चार जिल्ह्यांसाठी १५ कोटी रुपये मंजूर केले असल्याचे आदेश अव्वल सचिव आसोले यांनी काढले आहेत.**

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांमध्ये कार्यालयीन खर्च व इतर खर्चासाठी शासनाने निवडणूक खर्च म्हणून पान २ वर

### मराठवाड्यातील चार जिल्ह्यांसाठी पंधरा कोटी

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकसाठी ५० टक्के आरक्षणाच्या आत असलेल्या संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या चार जिल्ह्यात निवडणूक होत आहे. त्यासाठी पंधरा कोटी साठ लाख ३२ हजार ६४० रुपयाचा खर्चासाठीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामध्ये संभाजीनगर साठी पाच कोटी ३४ लाख ९१ हजार ५९० परभणी दोन कोटी ८५ लाख ८८ हजार ७१० धाराशिव तीन कोटी १९ लाख ७६ हजार ६४० तर लातूर जिल्ह्यासाठी चार कोटी १९ लाख ७५ हजार ७०० रुपये एवढा निधी निवडणूक खर्चासाठी मंजूर करण्यात आला आहे.

# दै.राज्य लोकतंत्र कार्यालयात श्रीमंत गणेश जयंती निमित्त होमहवन विधी






पिंपरी । प्रतिनिधी

**माघमास शुक्लपक्ष गणेश चतुर्थी निमित्त पिंपरी मोरवाडी येथील दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयामध्ये गुरूवार दिनांक २२ जानेवारी रोजी गणेश याग व तिर्थप्रसाद आयोजित करण्यात आला होता.**

दिवसभर होमहवन विधी संपन्न झाला व तिर्थप्रसाद वाटप करण्यात आला. दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी उपस्थित राहुन तिर्थप्रसाद घेतला त्यांचे स्वागत दैनिक राज्य लोकतंत्रचे प्रतिनिधी संजीव ओक यांनी श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी दैनिक राज्य लोकतंत्रचे मुख्य संपादक गणेश मोकाशी, डिजिटल मिडिया पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष विनय सोनवणे, लोकशाहीचा चौथा स्तंभ या पान २ वर

# डॉ.पाटील प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारसह पोलिसांना बजावली नोटीस

मुंबई । प्रतिनिधी

भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक आणि युट्यूबर डॉ. संग्राम पाटील यांना मुंबई विमानतळावर दोन वेळा रोखण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी संग्राम पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, न्यायालयाने राज्य सरकार आणि मुंबई पोलिसांना नोटीस बजावत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. या याचिकेवरील पुढील सुनावणी ४ फेब्रुवारीला होणार आहे.

संग्राम पाटील १० जानेवारीला लंडनमधून भारतात आपल्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी आले होते. मात्र मुंबई आंतरराष्ट्रीय पान २ वर

# आंध्रप्रदेशात १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी?

हैदराबाद । वृत्तसंस्था

सोशल मीडियाचा सर्वाधिक प्रभाव हा किशोरवयीन मुलांवर पडतो. या माध्यमाचा नकारात्मक प्रभाव टाळण्यासाठी ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया बंदी लागू केली आहे. आता देशातील आंध्रप्रदेशातही अशा प्रकारच्या निर्णयाबाबत गांभीर्याने विचार सुरू असून, लवकरच त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

याबाबत आंध्र प्रदेशचे मंत्री नारा लोकेश यांनी खुलासा केला की, सरकार १६ वर्षांखालील मुलांसाठी पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ जानेवारी २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३०.०० क्विंटल | २,३२१ | ३,१०० | २,६०८ |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.०० क्विंटल | १,७०० | ४,००१ | ३,३९६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ११८.०० क्विंटल | ५,५७० | ७,५६१ | ७,३३७ |
| उडीद : ४.५० क्विंटल | ४,८५० | ६,३०० | ५,५७५ |
| बाजरी: १९.०० क्विंटल | २,४०१ | ६,२२० | ३,१८९ |
| मुग:०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| सोयाबीन: १८४.०० क्विंटल | ४,९०० | ५,३०० | ५,१७१ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ४,९०० | ५,००४ | ४,९५२ |

## गणेशोत्सवः आत्मनिर्भरतेचे प्रतीक चित्ररथ सज्ज

# प्रजासत्ताक दिनी दिल्लीत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा होणर जयघोष



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापनदिनानिमित्त राजधानीतील कर्तव्यपथावर होणाऱ्या भव्य पथसंचलनासाठी महाराष्ट्राचा चित्ररथ सज्ज झाला असून, यंदा राज्याच्या वतीने 'गणेशोत्सवः आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला जाणार आहे. राष्ट्रीय गीत वंदे मातरम्ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर यंदाचा सोहळा विशेष ठरणार आहे. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष पान २ वर

### असा असेल चित्ररथ

महाराष्ट्राच्या या चित्ररथाची रचना अत्यंत कलात्मक आणि डोळ्यांचे पारणे फेडणारी आहे. चित्ररथाच्या अग्रभागी महाराष्ट्राच्या ऊर्जेचे प्रतीक असलेला एक भव्य ढोल आणि तो वाजवणारी पारंपारिक वेशभूषेतील महिला राज्याच्या प्रबळ स्त्रीशक्तीचे दर्शन घडवेल. चित्ररथाच्या मध्यभागात गणपतीची देखणी मूर्ती साकारणारा मूर्तिकार आणि विसर्जनासाठी निघालेला गणेशभक्त दर्शवण्यात आला आहे. चित्ररथाच्या शेवटच्या भागात महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायक मंदिराची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली असून, इतर सांस्कृतिक बाबींचेही बारकाव्यांसह दर्शन घडवण्यात आले आहे. चित्ररथाच्या दोन्ही बाजूस पारंपारिक नऊवारी साडी परिधान केलेल्या महिलांचे लेझीम पथक असेल.

# मध्यरात्री तरूणाकडून गोळीबार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील सायगावमध्ये रात्रीच्या सुमारास बेकायदेशीर पिस्टलातून गोळीबार करून परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या एका ३५ वर्षीय तरुणाला बर्दापूर पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली. या कारवाई दरम्यान पोलिसांनी परदेशी बनावटीच्या दोन पिस्तूल, काही जीवंत काडतूस, एक दुचाकी असा एकूण १ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. संबंधित व्यक्तीने गोळीबार का केला? याचा तपास पोलीस घेत असून सदरच्या घटनेमुळे तालुक्यात प्रचंड खळबळ उडाली आहे. ही घटना २१ जानेवारीच्या पहाटे घडली. या प्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मौजे सायगाव येथे २१ जानेवारी रोजी पहाटे दोनच्या सुमारास ही थरारक घटना घडली. आरोपी सय्यद पान २ वर



cmyk

## अग्रलेख

# उपयुक्तता आणि उपद्रवमूल्य

राजकारणात तुम्हाला वारंवार तुमची उपयुक्तता सिद्ध करावी लागते. ज्यावेळी तुमची उपयुक्तता संपते त्यावेळी तुम्हाला संपवण्यासाठी तुमचे विरोधक आणि मित्र म्हणून वागवणारे तुम्हाला संपवतात. उपयुक्तता संपली की उपद्रव मूल्य हे हत्यार बाहेर काढावे लागते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गत अशीच झाली आहे. एक वेळ त्यांना डोक्यावर घेणारे भाजपवाले आता त्यांची शक्ती क्षीण करण्याच्या मागे लागले आहेत. परंतु एकनाथ शिंदे यांनीही आपले उपद्रव मूल्य काढले तरच भाजपवाले शिस्तीत त्यांचा स्वीकार करतील.

नगरपरिषद निवडणुकीत बदलापूर आणि अंबरनाथ मध्ये काय घडले हे सर्वश्रुत आहे परंतु एकनाथ शिंदे मात्र बधले नाहीत. त्यांनीही भाजपला जशास तसे उत्तर दिले. त्यामुळेच भाजपला ठाणे आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेशी युती करावी लागली. अन्यथा भाजपला या दोन्ही महानगरपालिकांमध्ये स्वतंत्रपणे लढून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला धडा शिकवायचा होता. ठाणे आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत स्वतंत्रपणे लढून बहुमत मिळण्याची शक्यता नसल्याने भाजपने शिंदेसेनेशी युती केली मात्र नवी मुंबई महानगरपालिकेत वन मंत्री गणेश नाईक यांनी स्वतंत्रपणे लढून भाजप सत्तेवर येईल अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांना दिल्याने तेथे शिंदेसेनेला एकटे सोडण्यात आले. गणेश नाईक यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेला शब्द पाळला आणि स्वबळावर नवी मुंबईत बहुमत मिळवले.

मुंबई महानगरपालिकेत भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. गेल्या महानगरपालिका निवडणुकीत भाजपने एकसंघ शिवसेनेची युती न करता ८२ जागा मिळवल्या होत्या. यावेळी शिंदे सेना सोबत असताना सुद्धा त्यांचा घोडा ८९ वरच अडकला. शिंदे सेनेने ९० जागा लढवून फक्त २९ जागी विजय मिळवला. आमची शिवसेना खरी, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारावर चालणारी शिवसेना आमची असा दावा करत शिंदे नेहमी करतात. त्याचबरोबर निवडणूक आयोगाने ही शिंदे यांचा पक्ष मूळ शिवसेना असे गृहीत धरून त्यांना धनुष्यबाण ही निशाणीही बहाल केली. तरीसुद्धा मुंबई महानगरपालिकेत त्यांचा घोडा २९ जागांवर अडकला. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आल्यामुळे त्यांची मजल ७१ जागा पर्यंत गेली. परंतु ए आय एम आय एम या जातीयवादी पक्षाला मनसेपेक्षा दोन जागा म्हणजे आठ जागा मिळाल्या. ए आय एम आय एम या पक्षाची महाराष्ट्रात गेल्या लोकसभेपासून ताकद घटत चालली होती परंतु मुंबई व्यतिरिक्त औरंगाबाद मध्ये त्यांनी ३३ जागांपर्यंत मजल मारली आहे. मालेगाव ,भिवंडी मध्ये समाजवादी पार्टीपेक्षा ए आय एम आय एम या ओवेसी बंधूंच्या पक्षाला मुस्लिम बांधवांनी पसंती दिली.

उद्धव ठाकरे यांना सत्तेवरून खाली खेचण्यासाठी भाजपने एकनाथ शिंदे यांचा व्यवस्थित वापर केला मात्र शिंदे यांना पक्ष ,निशाणी ,सत्ता सर्व काही देऊनही ते उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला संपवू शकलेले नाहीत हे भाजपच्या सहा महिन्यापूर्वीच लक्षात आले होते. त्यामुळेच शिवसेना प्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे शिवाजी पार्क येथील राष्ट्रीय स्मारक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्या ताब्यात दिले आहे. खरी शिवसेना शिंदे यांची आहे असा दावा मुख्यमंत्री फडणवीस नेहमी करतात. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे कुणा एका कुटुंबाचे नव्हते तर उभ्या महाराष्ट्राचे दैवत होते. त्यामुळे त्यांचे स्मारक हे एकतर राज्य सरकारने स्वतःच्या ताब्यात ठेवून एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा अध्यक्ष या स्मारकाचा असायला हवा होता. परंतु सत्तेत असूनही ठाकरेंच्या मर्जीतले तिघेजण अर्थात उद्धव ठाकरे अध्यक्ष या स्मारकाचे सचिव शिवसेना नेते सुभाष देसाई आणि आदित्य ठाकरे हे या स्मारकावर आहेत. फक्त औपचारिकता म्हणून शिंदे सेनेचे शिशीर शिंदे यांना या स्मारकावर घेतले आहे. याचा अर्थ खरी शिवसेना कुणाची हे भाजपनेच न बोलता कबूल केले आहे.

मुंबई महानगरपालिकेत भाजपकडे बहुमताचा आकडा नाही त्यामुळे त्यांनी शिंदे सेनेने महापौर पदासाठी बिनशर्ट पाठिंबा द्यावा ही अपेक्षा ठेवली आहे. यापूर्वी मुंबई महानगरपालिकेत सत्तेत असताना भाजपचे निवडक नगरसेवक असताना त्यांनी कधी शिवसेनेला बिनशर्त पाठिंबा दिला नव्हता. उपमहापौर पद आणि वैधानिक समित्यांपैकी सुधार समिती आणि बेस्ट समिती या समित्या घेतल्या होत्या. त्याचबरोबर स्थायी समिती, सुधार समिती बेस्ट समिती आणि शिक्षण समिती या चारही वैधानिक समित्यांवर सदस्य पदे मिळवली होती. मात्र शिंदे सेनेने स्थायी समितीची मागणी केल्याने आता घोडे अडले आहे. अजूनही उद्धव यांची शिवसेना भाजपला आपला मुख्य शत्रू मानत नाही. त्यांचा मुख्य शत्रू अजूनही एकनाथ शिंदे यांचे शिवसेना आहे. त्यामुळे शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या न्यायाने उद्धव यांची शिवसेना आयत्यावेळी कोणताही निर्णय घेऊ शकते. त्यामुळेच दररोज शिवसेना नेते खासदार संजय राऊत हे महापौर पदाबाबत वेगवेगळी वक्तव्य करत आहेत.

शिंदे यांची शिवसेना ही भाजपची नैसर्गिक भागीदार असल्यामुळे ते फक्त दबावाचे राजकारण करत आहेत. गुरुवारी महापौर पदाची सोडत आल्यानंतर सर्वकाही सुरळीत होईल असे त्यांच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. ठाणे,कल्याण डोंबिवली येथेही त्यांना शिंदे यांना महापौर पदाबाबत अडचणी येऊ नयेत म्हणूनच हे दबावाचे राजकारण सुरू आहे. शिंदे यांनी मुंबईतल्या आपल्या सर्व नगरसेवकांना पंचतारांकित हॉटेल मध्ये यासाठी ठेवले की त्यांना नगरसेवक फुटण्याची भीती ही विरोधकांकडून नव्हती तर भाजपकडून होती. फोडाफोडीच्या राजकारणात पारंगत असलेल्या एकनाथ शिंदे यांना भाजपची चाल माहीत असल्यामुळेच त्यांनी तीन दिवस आपल्या नगरसेवकांना पंचतारांकित हॉटेलला ठेवले. भाजपकडून ग्वाही मिळाल्यानंतर त्यांनी आपल्या नगरसेवकांना घरी जाण्याची परवानगी दिली.

साभार : पत्रकार नितीन सावंत मुंबई (मो.९८९२५१४१२४)

# नगरसेवक ॲड.शिराळे यांनी घेतली मुख्याधिकाऱ्यांची भेट

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील विविध प्रश्नावरती विविध प्रश्नावरती मुख्याधिकारी शैलेश फडसे साहेब यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली यावेळी मुख्याधिकारी साहेब यांनी विविध प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिलेले आहे नगरसेवक गोविंद नवनाथ शिराळे पाटील यांनी वॉर्ड नंबर २५ मधील नाल्याचा प्रश्न पिण्याचे पाण्याचा प्रश्न विद्युत लाईटचा प्रश्न स्वच्छता व आरोग्य याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली , तसेच छत्रपती संभाजी महाराज स्टेडियम मधील लाईटचा प्रश्न यासह बीड शहरातील अनेक बाबतीत सखोल सदून वादक चर्चा करण्यात आली सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन मुख्याधिकारी शैलेश फणसे साहेब यांनी ॲड.गोविंद नवनाथ शिराळे पाटील सदस्य नगरपरिषद बीड यांना दिले यावेळेस त्यांनी माझे स्वागत केले व मी त्यांना शुभेच्छा दिल्या.




# पोलीस कर्मचाऱ्यास दारू पिऊन शिवीगाळ आरोपीला ४ महिने कारावासाची शिक्षा

**बीड । प्रतिनिधी**

**दिनांक २३-०१-२०१९ रोजी फिर्यादी ड्युटी करीत असताना, त्यास आरोपी सुधीर सुखदेव शिंदे, रा. केसापुरी परभणी, ता. जि. बीड याने शिवाजी नगर पोलीस स्टेशनमध्ये बसून मोबाईलवरून शिवीगाळ केली व त्यानंतर फिर्यादी पोलीस स्टेशनमध्ये आला असता, त्यास आरोपीने दारू पिऊन येऊन शिवीगाळ करून पाठीत बुक्का मारला. त्या प्रकरणी तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश-३, श्रीमती आर.एम. सातव मॅडम यांनी आरोपीस कलम ३५३, ३३२ भा.दं.वि. नुसार दोषी ठरवून ४ महिने सश्रम कारावास, तसेच कलम ८५ (१) मुंबई दारू बंदी कायदा नुसार दोषी ठरवून ३ महिने सश्रम कारावास व रु.१,०००/- दंड व दंड न भरल्यास १० दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

प्रस्तुत प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, फिर्यादी हा पोलीस कर्मचारी असून, तो शिवाजी नगर पोलीस स्टेशन हद्दीत चार्ली ड्युटी करत होता. तो ड्युटीवर असताना आरोपीने त्यास फोन करून 'तु माझ्या मुलाला का मारलेस, तो मुलींना छेडू नाही तर काहीही करू', असे म्हणून मोबाईलवर शिवीगाळ केली व 'तु पोलीस स्टेशन शिवाजी नगर येथे नौकरी कसा करतो ते पाहतो', असे म्हणून शिवीगाळ केली. त्यानंतर फिर्यादी पोलीस स्टेशन, शिवाजी नगर, बीड येथे आला असता, आरोपी हा पोलीस स्टेशनमध्येच बसलेला होता व त्याने फिर्यादीस 'हरामखोर' असे म्हणून शिवीगाळ केली व त्याची कॉलर पकडून पाठीत बुक्का मारला. त्यावेळी पोलीस स्टेशनमधील कर्मचाऱ्यांनी सोडवा-सोडव केली व आरोपी त्यावेळेस दारू पिलेला होता. आरोपीचे विरूद्ध सरकारी कामकाजात अडथळा केला, अशा आशयाची फिर्याद नोंदवण्यात आली व भा.दं. वि. कलम ३५३, ३३२ व कलम ८५ (१) मुंबई दारूबंदी अधिनियम नुसार पोलीस स्टेशन, बीड शहर येथे गु.र.नं. १७/२०१९ नोंद करण्यात आला व सदर गुन्ह्याचा तपास श्री. जाधव एस.बी., पोलीस उपनिरीक्षक यांचेकडे देण्यात आला व त्यांनी सदर प्रकरणात तपास करून आरोपीचे विरूद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.सदर प्रकरणाची सुनावणी मा. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश-३, श्रीमती आर.एम. सातव मॅडम यांच्या समोर झाली. सदर प्रकरणात आरोपी विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी सरकार पक्षातर्फे एकूण ५ साक्षीदार तपासण्यात आले. सदर प्रकरणात फिर्यादीचा जवाब व इतर साक्षीदारांचे जवाब व वैद्यकिय पुरावा याचे अवलोकन करून व सहाय्यक सरकारी वकील ॲड. अमित पद्माकर हसेगावकर यांचा युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपी सुधीर उर्फ सुदाम सुखदेव शिंदे यास भा.दं. वि. कलम ३५३, ३३२ नुसार दोषी ठरवून ४ महिने सश्रम कारावास, तसेच कलम ८५ (१) मुंबई दारू बंदी कायदा नुसार दोषी ठरवून ३ महिने सश्रम कारावास व रू.१,०००/- दंड व दंड न भरल्यास १० दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणात सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील ॲड. अमित पद्माकर हसेगावकर यांनी काम पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी श्रीमती ए.एच. सिंगल यांनी सहकार्य केले.




# सर्वांना सोबत घेऊन जालना शहर एक आदर्श बनेल-जिल्हाधिकारी मित्तल

## जिल्हाधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल यांचे नवनिर्वाचित सदस्या सोबत संवाद

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय व्हावा आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी एक सामायिक दृष्टीकोन तयार व्हावा, या उद्देशाने २२ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली 'महसूल भवन' येथे विशेष संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नवनिर्वाचित सदस्यांचे पुष्प आणि त्यांच्या नावाच्या वैयक्तिक डायरी देऊन स्वागत करण्यात आले.**

लोकप्रतिनिधींनी मांडल्या शहराच्या समस्या आणि उपाय बैठकीच्या सुरुवातीला सर्व सदस्यांनी आपला परिचय दिला. त्यानंतर आयुक्तांच्या सूचनेनुसार विविध सदस्यांनी शहराच्या विकासाबाबत आपली मते मांडली: महिला सक्षमीकरण आणि प्रशिक्षण: नवनिर्वाचित सदस्या यांनी गृहिणी असलेल्या सदस्यांसाठी महापालिका कामकाज आणि कायद्याचे प्रशिक्षण देण्याची मागणी केली. तसेच जन्म-मृत्यू विभागात कर्मचारी वाढवण्याची गरज व्यक्त केली. स्वच्छता आणि नागरी सुविधा मूलभूत सुविधा, प्लास्टिक बंदी, उघड्यावर मांस विक्रीचे नियोजन आणि शहराचे स्वच्छता रँकिंग सुधारण्यावर भर दिला. सर्वांनी 'एक परिवार' म्हणून काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. अनुभवाचा संगम: दर्शना झोल यांनी जुन्या आणि नवीन सदस्यांनी एकत्रित येऊन शहराचा विकास करणे. नागरिकांना 'जन्मापासून मृत्यूपर्यंत' आवश्यक असणाऱ्या सेवा महापालिकेने सक्षमपणे देण्याचे प्रतिपादन केले. नियोजनबद्ध विकास पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक, पाच वर्षांचा '' तयार करणे आणि स्वच्छ प्रभागाला विशेष निधी देण्याची संकल्पना मांडली. महसूल आणि पायाभूत सुविधा: राजेश राऊत यांनी महापालिकेच्या जागी शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारून उत्पन्न वाढवण्याची सूचना केली, तर दुर्गेश काठोठीवाले यांनी काद्राबादमधील वाहतूक कोंडीचा प्रश्न मांडला. श्रीकांत पांगारकर यांनी पाणी साठवण क्षमता वाढवण्यावर सूचना दिला. 'जालना फर्स्ट'कडून डिजिटल पाऊल बैठकीत ' ' चे गोविंद काबरा यांनी नागरिकांच्या सोयीसाठी विकसित केलेल्या विशेष मोबाईल ॲप्लिकेशनची माहिती दिली, ज्यामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक सुलभ होणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे



सादरीकरण जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे महापालिकेचे नियम आणि आगामी प्रकल्पांची माहिती दिली: प्रमुख प्रकल्प: सौर ऊर्जा प्रकल्प (१५ मेगावॅट), नवीन उद्याने, मोतीबाग सुशोभीकरण (सनसेट पॉईंट), आणि अंबड येथील नवीन फिल्टर बेड. आरोग्य व स्वच्छता: नागरी आरोग्य केंद्रांची संख्या ७ वरून २३ करण्यात आली आहे. सांडपाणी प्रकल्प मार्च अखेर सुरू होईल. तसेच नागपूरच्या एजन्सीसोबत घनकचरा व्यवस्थापनाचा करार झाला असून, यामुळे पालिकेला विनाखर्च महसूल मिळणार आहे. प्राणी सुरक्षा: ५० क्षमतेचे डॉग शेल्टर उभारले असून ७४५ कुत्र्यांचे निर्बीजीकरण पूर्ण झाले आहे. कडक शिस्त आणि 'स्वच्छता मॉनिटरिंग' आयुक्त आशिमा मित्तल यांनी स्पष्ट केले की, आता नगर परिषद नसून महानगरपालिका असल्याने कामाची पद्धत बदलावी लागेल. त्यांनी खालील महत्त्वपूर्ण घोषणा केल्या: प्रशिक्षण: सर्व सदस्यांसाठी कायदेशीर कामकाजाचे प्रशिक्षण आयोजित केले जाईल. शुक्रवारी स्वच्छता मोहीम: दर शुक्रवारी दुपारी ३:३० ते ४:३० या वेळेत शहरात स्वच्छता मोहीम राबवली जाईल. पारितोषिक: शहरातील सर्वात स्वच्छ प्रभागाला विशेष बक्षीस देऊन गौरविण्यात येईल. शिस्त: कोणीही फायली घेऊन फिरू नये, सर्व कामे नियमानुसार होतील. कर्मचारी आणि सदस्यांनी परस्परांचा सन्मान राखावा. ''आपल्याकडे स्टील आणि कृषी उद्योगांचे मोठे भांडवल आहे. आपण सर्वांनी एकत्रित प्रयत्न केल्यास जालना हे एक आदर्श शहर बनेल,'' असा विश्वास जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## पान १ वरून...

### बदलत्या वातावरणाचा

वाढते. परिणामी, धुके तयार होऊन त्याचा थेट परिणाम पिकांवर होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. याशिवाय अतिवृष्टीमुळे कांद्याची रोपे खराब झाल्याने अनेक शेतकऱ्यांना दुबार रोपे लावावी लागली, तर काहींनी विकतची रोपे घेऊन लागवड केली. त्यामुळे यंदा कांदा पिकाच्या खर्चात आधीच वाढ झाली असून, त्यातच ढगाळ हवामानामुळे फवारणीचा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांना करावा लागत आहे.

----------

### बीडमधील व्यापाऱ्यावर

जीएसटी पथकातील अधिकाऱ्यांच्या गाड्या देखील व्यापाऱ्याच्या दारात उभे असून दुपारी उशिरापर्यंत ही तपासणी सुरूच होती. तांत्रिक मुद्द्यांच्या आधारे ही झाडाझडती सुरू असल्याचे वृत्त असून याबाबत संबंधित पथकाने मोठी गोपनीयता पाळल्याचे दिसून येत आहे. पत्राच्या शेडमध्ये संबंधित व्यापाऱ्याचा सुरू झालेला व्यवसाय अतिशय कमी वेळेत इथपर्यंत कसा पोहोचला ? याचीही चौकशी सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र याबाबत जीएसटी पथकाच्या अधिकाऱ्यांनी किंवा संबंधित कारल्याने अद्याप पर्यंत कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही.

-----------------

### राज्यातील २९ महापालिकांच्या

प्रवर्गासाठी ठेवण्यात आली आहेत. यामध्ये महिला आणि पुरुष आरक्षणाचा समावेश आहे.

----------

### दै.राज्य लोकतंत्र कार्यालयात श्रीमंत

वृत्तपत्राचे संपादक सागर सुर्यवंशी, एच आर न्युज मराठीचे संपादक हणुमंत रामदासी, दैनिक राज्य लोकतंत्र चे प्रतिनिधी सिद्धांत चौधरी यांच्यासह पिंपरी चिंचवड पत्रकारसंघाचे पदाधिकारी व डिजिटल मिडीयाचे पदाधिकारी उपस्थित होते. याशिवाय अनेक मान्यवर आणि हितचिंतकांनीही याठिकाणी उपस्थिती लावली.

----------

### जिल्हा परिषद निवडणूक

गुरूवारी ५८ कोटी ७१ लाख ७९ हजार ७४० रुपये एवढ्या खर्चास मंजुरी दिली आहे. राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका गेल्या चार वर्षापासून झाल्या नाहीत. जिल्हा परिषद व पंचायत समितीचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर काही जिल्ह्यांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याचे न्यायालय आणि आयोगाच्या निदर्शनास आल्यानंतर ज्या ५०% पेक्षा अधिक पुढे गेले आहेत त्यांच्या निवडणुका स्थगित करत १२ जिल्ह्यातील जिल्हा परिषद लोकांच्या समितीच्या निवडणुकांचा कार्यक्रमय जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार या १२ जिल्ह्यांमध्ये जवळपास दोन कोटी आठ लाख २३ हजार ६५० एवढे मतदार आहेत. मंजूर करण्यात आलेल्या निधी वाहन भाडे कर्मचाऱ्यांचा भत्ता व इतर स्टेशनरी यांचा समावेश आहे. मराठवाड्यातील संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या चार जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका होत आहेत. या चार जिल्हा परिषदेसाठी १५ कोटी ६० लाख ३२ हजार ६४० रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये संभाजीनगरसाठी पाच कोटी ३४ लाख, परभणी दोन कोटी ८५ लाख, धाराशिव तीन कोटी एकोणीस लाख, लातूर चार कोटी १९ लाख, असा निधी मंजूर करण्यात आला आहे.

----------

### आंध्रप्रदेशात १६ वर्षांखालील

सोशल मीडियावर बंदी घालण्याचा विचार करत आहे. ही बंदी ऑस्ट्रेलियाने लागू केलेल्या बंदीसारखीच असेल. दावोस येथील जागतिक आर्थिक मंचच्या निमित्ताने ब्लूमबर्गशी बोलताना, आंध्रच्या माहिती तंत्रज्ञान मंत्र्यांनी सांगितले की, एका विशिष्ट वयापेक्षा कमी वयाच्या तरुणांनी अशा प्लॅटफॉर्मवर नसावे. कारण ही मुले अशा माहितीच्या संपर्कात येतात ज्या त्यांना पूर्णपणे समजत नाही. त्यामुळेच एका मजबूत कायदेशीर चौकटीची आवश्यकतेबाबत विचार आवश्यक आहे. राज्य सरकार अशा निर्णयाचा गांभीर्याने विचार करत आहे. हा निर्णय लागू झाला, तर आंध्र प्रदेश मुलांसाठी सोशल मीडिया वापरावरील निर्बंध आणणारे भारतातील पहिले राज्य ठरणार आहे. मंत्री लोकेश यांना पाठिंबा देत तेलगू देसम पार्टीचे राष्ट्रीय प्रवक्ते दीपक रेड्डी यांनी स्पष्ट केले की, वायएसआरसीपी सरकारच्या काळात, महिलांविरुद्ध क्रूर आणि अपमानजनक हल्ले करण्यासाठी सोशल मीडियाचा उघडपणे गैरवापर करण्यात आला होता. एका विशिष्ट वयापेक्षा कमी वयाची मुले ऑनलाइन सहज उपलब्ध असलेली नकारात्मक आणि हानिकारक सामग्री समजून घेण्यासाठी भावनिकदृष्ट्या पुरेशी परिपक्व नसतात. म्हणूनच आंध्र सरकार जागतिक सर्वोत्तम पद्धतींचा अभ्यास करत आहे आणि ऑस्ट्रेलियाच्या १६ वर्षांखालील मुलांसाठीच्या सोशल मीडिया कायद्याची तपासणी करत आहे, असेही रेड्डी यांनी स्पष्ट केले.

-------------------

### डॉ.पाटील प्रकरणी मुंबई उच्च

विमानतळावर उतरल्याबरोबर मुंबई पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांची काही तास चौकशी करण्यात आली. यानंतर संग्राम पाटील १९ जानेवारीला पुन्हा लंडनला परत जाणार होते. मात्र यावेळीही इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी त्यांना विमानतळावरच थांबवले. संग्राम पाटील यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या नावावर लुकआऊट सर्क्युलर जारी करण्यात आले असून ते अद्याप रद्द न झाल्यामुळे त्यांना देशाबाहेर जाण्याची परवानगी मिळू शकत नाही, असे इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रकरणात संग्राम पाटील यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून, आपल्यावर दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करावा तसेच एलओसी देखील रद्द करावा, अशी मागणी केली आहे. गुरूवारी झालेल्या सुनावणीत संग्राम पाटील यांच्या वकिलांनी हे सर्व बेकायदेशीर असल्याचा युक्तिवाद न्यायालयात केला. दुसरीकडे राज्य सरकारच्या वतीने न्यायालयात सांगण्यात आलें की, संग्राम पाटील तपासाला सहकार्य करत नाहीत, त्यामुळे एलओसी कायम ठेवण्याची गरज आहे. संग्राम पाटील यांच्यावर भाजपच्या वरिष्ठ नेत्यांविरोधात सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याचा आरोप आहे. त्याच प्रकरणात गुन्हा दाखल झाल्याचे सांगितले जात आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेत, राज्य सरकार आणि मुंबई पोलिसांना नोटीस बजावली आहे आणि याचिकेवर उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. आता पुढील सुनावणी ४ फेब्रुवारीला होणार आहे.

-----------

### मध्यरात्री तरूणाकडून

अहमदअली मुब्बशीरअली हाशमी याने आपल्या ताब्यात बेकायदेशीररीत्या विनापरवाना अग्नीशस्त्रे बाळगून लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा पद्धतीने गोळीबार केला. शांत असलेल्या सायगाव परिसरात अचानक गोळ्यांच्या आवाजाने नागरिक भयभीत झाले होते. या घटनेची माहिती मिळताच बर्दापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक कांबळे आणि पोलीस उपनिरीक्षक घुले यांनी तातडीने पथकासह घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले.या प्रकरणी पोलीस हवालदार गणेश विक्रम तांदळे यांनी बर्दापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी आरोपीची आणि घटनास्थळाची झडती घेतली असता त्याच्याकडे मेड इन युएसए बनावटीची ९ एमएम पिस्टल, मेड इन जपान बनावटीची चांदीच्या रंगाची रिवॉल्वर आणि तीन जिवंत काडतुसे मिळून आली. तसेच गुन्ह्यात वापरलेली टीव्हीएस स्टार सिटी मोटारसायकल क्रमांक एमएच २३ आर ०३१७ ही देखील पोलिसांनी जप्त केली आहे. पोलिसांनी या कारवाईत एकूण १ लाख ३३ हजार रुपयांचा ऐवज हस्तगत केला आहे.आरोपी सय्यद अहमदअली मुब्बशीरअली हाशमी याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियम आणि भारतीय न्याय संहिता कलम ११० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सदर आरोपीने ही घातक परदेशी बनावटीची शस्त्रे कोठून आणली आणि गोळीबार करण्यामागचा त्याचा नेमका उद्देश काय होता, याचा सखोल तपास पोलीस उपनिरीक्षक घुले करत आहेत. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला असून सध्या गावात शांतता आहे.

---------------

### प्रजासत्ताक दिनी दिल्लीत महाराष्ट्राच्या

अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीत संचलनात सहभागी होणारा महाराष्ट्राचा हा चित्ररथ राज्याची प्रदीर्घ परंपरा आणि वाढत्या आर्थिक सामर्थ्याचे दर्शन अवघ्या जगाला घडवेल. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून ज्या सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, तिच चळवळ आज आधुनिक भारताला कशी आत्मनिर्भर बनवत आहे, याचे प्रभावी चित्रण या चित्ररथात करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा शाश्वत रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथाच्या केंद्रस्थानी आहे. महाराष्ट्र शासनाने वर्ष २०२५ पासून सार्वजनिक गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली असून, या उत्सवामुळे केवळ सांस्कृतिकच नव्हे, तर पर्यावरणीय आणि आर्थिक आत्मनिर्भरतेसही कशी चालना मिळते, हे या चित्ररथातून ठळकपणे मांडण्यात आले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....




## थोडक्यात

### अपहरण प्रकरणातील आरोपीला न्यायालयाकडून जामीन मंजूर !

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील बायपास रोडवरील भाजीमार्केट येथून व्याजाचे पैशाचे कारणावरून अपहरण केल्याच्या प्रकरणातील आरोपीस माजलगाव येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयाने अटीशर्थीसह जामीन मंजूर केला आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की,माजलगाव शहर परिसरातील बायपास रोडवरील भाजी मार्केट येथून सदर घटनेतील आरोपी नामे तुषार गोवर्धन गायकवाड याने भाजी मार्केट येथून परमेश्वर काशिनाथ लबासे याचे सोन्याचे दुकान टाकण्यासाठी व्याजाने पैसे दिले होते ते देत नसल्यमुळे अपहरण केल्याबाबतच्या तक्रारीवरून दि. ४ जानेवारी २०२६ रोजी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात कलम १४० (३),३ भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.प्रकरणातील आरोपीस दि.५ जानेवारी रोजी अटक करण्यात आले होते त्यानंतर त्यास मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आर.बी.पोळ साहेब यांच्या न्यायालयासमोर उभे केले असता आरोपीस तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. पोलीस कोठडीचा कालावधी संपल्यानंतर आरोपीस मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयामोर हजर केले त्यानंतर आरोपीस न्यायालयीन कोठडीत सुनावण्यात आली.प्रकरणातील आरोपीचे वतीने ॲड.एस.एम. सिद्धिकी (मनसबदार) यांच्या प्रभावी युक्तिवादावरून आरोपीस मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांनी अटी शर्थीसह जामीन मंजूर केला आहे.सदरील प्रकरणात ॲड व्ही.एस.जोशी यांनी मार्गदर्शन केले. प्रकरणात आरोपीस जामीन मिळाल्याने ॲड.एस.एम.सिद्धिकी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

### सुरेश खांडेकर करणार महाराष्ट्र केसरी स्पर्धेत बीड जिल्ह्याचे नेतृत्व

दिंद्रुड । प्रतिनिधी



धारूर तालुक्यातील फकीर जवळा येथील पैलवान सुरेश अशोक खांडेकर याची ५७ किलो वजन गट चाचणी मध्ये महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी बीड जिल्ह्यातून निवड झाली. परळी तालुक्यातील तपोवन येथे १८ जानेवारी रोजी ही निवड करण्यात आली. या निवडीबाबत ग्रामस्थांच्या वतीने त्याचा सहृदय सत्कार करण्यात आला.

परळी तालुक्यातील तपोवन येथे महाराष्ट्र केसरी बीड जिल्हा निवड चाचणी कुस्ती स्पर्धेचे आयोजन जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने रविवारी करण्यात आले होते. ५७ वर्षे वयो गटात जवळा येथील बजरंग बली कुस्ती संकुलचा पहेलवान सुरेश अशोक खांडेकर याने जिल्ह्यातील नामवंत पैलवान यांना नमवत महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. आगामी काळात कोल्हापूर येथे ही स्पर्धा होणार असून धारूर तालुक्यातील जवळा या ग्रामीण भागाचे नाव मोठे करण्यासाठी तो पात्र ठरल्याबाबत ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी मंगळवारी सत्कार करत शुभेच्छा दिल्या या प्रसंगी सरपंच त्रिंबक साबळे, ग्रामपंचायत सदस्य श्रीमंत चोपडे, शिवाजी साबळे, रोहिदास गवळी, प्रशांत चोपडे, वस्ताद अनिकेत गोरे,वस्ताद माऊली गोरे, हनुमान खांडेकर, सुनील साबळे, सुंदरराव ठोंबरे,केशव साबळे सह नागरिक उपस्थित होते.

# एकवीस हजार ५११ निराधारांना न्याय

## तहसीलदार शेळके यांच्या पुढाकारातून प्रस्तावांचा वेगवान निपटारा

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील निराधार , वयोवृद्ध , दिव्यांग आणि दुर्धर आजारग्रस्त घटकांसाठी प्रशासनाचा हात खऱ्या अर्थाने आधार बनत असल्याचे चित्र सध्या बीड तहसील कार्यालयात दिसून येत आहे . संजय गांधी निराधार योजना , श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजना तसेच इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजनेंतर्गत सादर होणाऱ्या प्रस्तावांचा दरमहा वेगवान व पारदर्शक निपटारा बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे .

मागील महिन्यात तालुकास्तरीय समितीची सविस्तर बैठक घेण्यात आली असून , त्यामध्ये तब्बल १,०४५ निराधार लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी पात्र ठरविण्यात आले . या पात्र लाभार्थ्यांची अधिकृत यादी प्रसिद्ध करण्यात आली असून , त्यांना प्रत्यक्ष लाभ देण्याची कार्यवाही तहसीलस्तरावरून सुरू करण्यात आली आहे. संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेंतर्गत निराधार नागरिकांना दरमहा १,५०० रुपये तर दिव्यांग लाभार्थ्यांना २,५०० रुपये इतके अनुदान दिले जाते . ही रक्कम केवळ आर्थिक मदत नसून , गरजू घटकांच्या जगण्याला दिलेला आधार असल्याची भावना लाभार्थ्यांकडून व्यक्त होत आहे .

या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव तहसील कार्यालयात सादर केले जातात . त्यानंतर तालुकास्तरीय समितीच्या बैठकीत प्रस्तावांची काटेकोर छाननी करून पात्र लाभार्थ्यांना मंजुरी दिली जाते . पदभार स्वीकारल्यापासून प्रलंबित प्रस्तावांचा बोजा कमी करण्यासाठी आणि कोणताही प्रस्ताव रखडू नये यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दरमहा बैठका घेण्यावर विशेष भर दिला आहे . या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरमहा शेकडो प्रस्ताव



तहसील कार्यालयात दाखल होत असतात . हे सर्व प्रस्ताव वेळेत निकाली काढण्यासाठी दर महिन्याला समितीची बैठक घेण्याचा निर्धार तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी व्यक्त केला असून , भविष्यात कोणताही प्रस्ताव प्रलंबित राहणार नाही , असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे. बीड तहसील कार्यालयामार्फत सध्या २१ हजार ५११ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीद्वारे दरमहा थेट अनुदान जमा करण्यात येत आहे . संजय गांधी निराधार योजना , श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजना तसेच इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजनेंतर्गत ही प्रक्रिया सातत्याने राबविली जात असून , त्यामुळे निराधार , वृद्ध व गरीब कुटुंबांना नियमित आर्थिक आधार मिळत आहे. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पदभार स्वीकारल्यानंतर दिव्यांग , दुर्धर आजारग्रस्त व वयोवृद्ध घटकांतील अनेक लाभार्थ्यांना नव्याने मंजुरी देण्यात आली आहे . कुटुंब अर्थसहाय्य योजनेंतर्गत ३९ लाभार्थ्यांना प्रत्येकी २० हजार रुपये आर्थिक मदत देण्यात आल्याची माहिती तहसील कार्यालयाकडून देण्यात आली आहे. निराधार घटकांना केवळ अर्ज सादर करण्यापुरते न ठेवता , आवश्यक कागदपत्रांची पूर्तता , प्रक्रियेबाबत मार्गदर्शन आणि नियमित पाठपुरावा करण्यात येत आहे. दर महिन्याला घेतल्या जाणाऱ्या विशेष बैठकींमुळे योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचत आहे. या कार्यामध्ये तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे , सहाय्यक महसूल अधिकारी हेमलता परचाके , महसूल सहाय्यक वैशाली बहिरवाड तसेच ऑपरेटर महेंद्र राऊत हे अधिकारी व कर्मचारी सातत्याने कार्यरत असून , त्यांच्या संवेदनशील व लोकाभिमुख कार्यपद्धतीमुळे गरजू घटकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.प्रशासन कागदांपुरते न राहता माणसांच्या आयुष्याशी जोडले गेले , तर त्यातूनच खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाची अनुभूती निर्माण होते. बीड तहसील कार्यालयातील ही कार्यपद्धती त्याचे जिवंत उदाहरण ठरत आहे .

# रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत रिक्षाचालकांसाठी प्रबोधन शिबिर

बीड । प्रतिनिधी

रस्ता सुरक्षा अभियान-२०२६ अंतर्गत बीड परिवहन विभाग, जिल्हा पोलीस वाहतूक शाखा व एसटी महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी रिक्षाचालकांसाठी वाहतूक नियमांचे प्रबोधन शिबीर घेण्यात आले. यावेळी आरटीओ विभागाचे सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक प्रदीप बिराजदार, पूजा खडकीकर जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी उपस्थित रिक्षाचालकांना वाहतूक नियमाबद्दल मार्गदर्शन केले.

सध्या बीड जिल्ह्यामध्ये रस्ता सुरक्षा अभियान सुरू असून या अभियाना अंतर्गत



**रिक्षा चालकांना केले स्टिकर व नियम पुस्तिकेचे वाटप**

परिवहन विभाग, जिल्हा पोलीस वाहतूक शाखा व एसटी महामंडळाच्या वतीने शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात जवळपास दीडशे रिक्षाचालक उपस्थित होते. यावेळी प्रदीप बिराजदार, पूजा खेडकर या आरटीओ विभागाच्या अधिकाऱ्यांसह वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी रिक्षाचालकांना वाहतूक नियमांची माहिती दिली. यावेळी आरटीओ विभागाचे सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक योगेश रबडे, अशोक गीते, एसटी विभागाच्या वाहतूक निरीक्षक सुषमा घुले , जिल्हा वाहतूक शाखेचे पोहेका आदिनाथ मुंडे, सखाराम घोलप, बाळासाहेब नागरगोजे आदी अंमलदार उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन झाल्यानंतर सर्व रिक्षा चालकांना वाहतूक नियमांची पुस्तिका व स्टीकरचे वाटप करण्यात आले.

## पान ६ वरुन...

### नगराध्यक्षा व नगरसेवकांनी

नागरिकांची कामे वेळेत मार्गी लावणे आणि कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपलब्ध राहणे, याबाबत आपुलकीने विनंती करण्यात आली. या अभिनव उपक्रमामुळे नगरपरिषद कार्यालयाच्या परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले. शिस्तीबाबत सूचना देतानाच कर्मचाऱ्यांच्या सन्मानाची जाणीव ठेवणारी ही सकारात्मक पद्धत वापरण्यात आली.याबाबत नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले की,नगरपरिषद ही नागरिकांची सेवा करणारी संस्था आहे. येथे शिस्त, वेळेचे भान आणि जबाबदारी अत्यंत महत्त्वाची आहे. कर्मचाऱ्यांशी सन्मानाने संवाद साधूनच अपेक्षित बदल घडवता येतात. दंडात्मक उपायांपेक्षा सकारात्मक प्रेरणा अधिक परिणामकारक ठरते. त्यामुळे आम्ही सर्व कर्मचाऱ्यांना अधिकृत काही लेखी नोटीस सूचना काढण्यापेक्षा त्यांचे प्रत्यक्ष स्वागत करून व आत्मीय संवाद व समन्वय ठेवून याबाबतचा संदेश देण्याचा सकारात्मक प्रयत्न केलेला आहे त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या दिरंगाई आणि कामातील वेळा पाळण्याबाबत निश्चित सकारात्मक बदल होईल अशी आम्हाला खात्री आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

परळी नगरपरिषदेत नव्या नेतृत्वाने स्वीकारलेली ही सकारात्मक आणि योग्य समन्वयाच्या दृष्टिकोनातून केलेली ही कृती, प्रशासनात शिस्त आणि कार्यपद्धती सुधारण्यासाठी एक आदर्श उदाहरण ठरणार आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह नगरसेवक वैजनाथ सोळंके,योगेश मेनकुदळे, सचिन सारडा, हाजीबाबू, राजा पांडे, राजाखान पठाण, अनंत इंगळे,महेंद्र रोडे,जयराज देशमुख, नितीन बागवाले आदी उपस्थित होते.

### नॅशनल हायवे ५४३

यामुळे भविष्यात रस्ता खचण्याची तसेच अपघातांची शक्यता नाकारता येत नाही.

अंदाजपत्रकाचा फलक गायब

कोणत्याही शासकीय प्रकल्पाच्या ठिकाणी प्रकल्पाची माहिती, अंदाजित खर्च व कामाचा कालावधी दर्शवणारा अंदाजपत्रकाचा फलक लावणे बंधनकारक असते. मात्र, या महामार्गाच्या कामाच्या ठिकाणी असा कोणताही फलक नसल्याने कामात पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

### आ.धस यांची प्रगतशील

तसेच दूध व्यवसाय अधिक फायदेशीर व शाश्वत कसा करता येईल, गाईंची योग्य निवड, गाई लागवड (ब्रिडिंग), आरोग्य व्यवस्थापन, लसीकरण व स्वच्छतेचे महत्त्व यावरही त्यांनी भर दिला. मुक्त संचार गोठ्यांचे फायदे सांगत अशा पद्धतीने गोठे उभारल्यास गाईंचे आरोग्य सुधारते व उत्पादन वाढते, असे त्यांनी नमूद केले.

यासोबतच शेततळे, जलव्यवस्थापन, तसेच शेतीला पूरक उत्पन्न देणाऱ्या द्राक्षे, डाळिंब व आंबा फळबाग या फळ बागेचे आधुनिक तंत्रज्ञान, नियोजन आणि मेहनतीच्या जोरावर शेती व दुग्धव्यवसायातून शेतकऱ्यांना निश्चितच समृद्धी साधता येईल असा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला. या पाहणी दरम्यान शेतकरी, दूध उत्पादक, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्रेया ठोंगे संगीत विशारद

श्रेयाने शास्त्रीय गायनाची परीक्षा सिद्धेश्वर विद्यालयच्या केंद्रावर दिली होती. त्या केंद्रावर प्रारंभीक ते मध्यमा पूर्ण या परीक्षेसाठी एकूण ३० विद्यार्थी बसले होते तर विशारद प्रथम आणि पूर्ण या परीक्षेसाठी एकूण १४ विद्यार्थी बसले होते. श्री सिद्धेश्वर विद्यालयाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, कार्यवाह विश्वास जोशी, माध्यमिक विभागाचे अध्यक्ष प्रशांत भानप, माध्यमिक विभागाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रप्रमुख मुख्याध्यापक संतोष लिंबकर,उपमुख्याध्यापक विवेक जोशी व तसेच संगीत अध्यापक चैतन्य आहेर आणि कुणाल कुलकर्णी या सर्वांनी श्रेयाला मिळालेल्या यशाबद्दल तिचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### नीट परीक्षेतील घोटाळा

म्हणून स्वीकारले. सदर प्रकरणातील या आरोपींनी जामिनासाठी न्यायालयात अर्ज केला होता. यावेळी तक्रारदाराच्या वतीने ॲड. तेजस नेहरकर यांनी बाजू मांडली. त्यांनी न्यायालयात सविस्तर मांडणी केली की, आरोपींनी जाणीवपूर्वक फिर्यादीच्या अज्ञानाचा आणि त्यांच्या मुलीच्या करिअरच्या चिंतेचा फायदा घेऊन मोठी आर्थिक लूट केली आहे. शिक्षणाच्या नावाखाली चालणारा हा गोरखधंदा समाजासाठी घातक असून, अशा प्रकरणांत आरोपींना अटकपूर्व जामीन दिल्यास तपास कामात अडथळे येतील, असा आक्रमक युक्तिवाद ॲड. नेहरकर यांनी केला. ॲड. तेजस नेहरकर यांनी मांडलेले मुद्दे आणि फसवणुकीचे पुरावे ग्राह्य धरून माननीय न्यायालयाने तिन्ही आरोपींचे जामीन अर्ज फेटाळून लावले आहेत. या प्रकरणात सरकार पक्षा तर्फे ॲड.अजय तांदळे यांनी काम पाहिले या निर्णयामुळे शैक्षणिक क्षेत्रात फसवणूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, पीडित कुटुंबाला न्याय मिळण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## यशवंत विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

बीड । प्रतिनिधी

शहरातील यशवंत विद्यालय या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन यशवंतराव चव्हाण नाट्यगृहामध्ये मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवनेरी शिक्षण प्रसारक



मंडळाचे अध्यक्ष तथा यशवंत माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश वाघ हे होते. तर उद्घाटक म्हणून शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या मार्गदर्शिका सौ सुधामतीताई वाघ ह्या होत्या. प्रमुख पाहुणे संस्थेचे सचिव नामदेव वाघ, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री धुमाळ एम.एस., श्री शरदचंद्र विद्यामंदिर या शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद गायकवाड, मथुराबाई पिंगळे विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल मुळूक, माऊली प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष माने, समर्थ गुरुकुल चे संचालक घाडगे, आई गुरुकुल चे संचालक जाधव, न्यू मानस गुरुकुल चे संजय सुरवासे पार्थ गुरुकुलचे भिंगले सर हे उपस्थित होते.

या वेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष गणेश वाघ यांनी सांगितले की, स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांमध्ये संघ भावना एकत्रित काम करण्याची सवय लागते आणि यातून नवीन कलाकार घडू शकतो. तसेच संस्थेचे संस्थापक सचिव स्वर्गीय गोविंदरावजी वाघ यांनी संस्थेसाठी दिलेल्या अमूल्य योगदान व त्याच्या कार्याला उजाळा दिला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या उद्घाटक संस्थेच्या संचालक ज्येष्ठ मार्गदर्शक श्रीमती सुधामती वाघ यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत यापुढे ही विद्यार्थी गुणवत्ता विकास वाढीसाठी संस्था राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देऊन पालकांनी नियमित शाळेशी संपर्क ठेऊन आपल्या पाल्याच्या प्रगतीबाबत लक्ष ठेवावे असे सांगितले. वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमांमध्ये विविध प्रकारचे मराठी हिंदी गीत व नृत्य सादर करण्यात आले. कलाकारांनी यामध्ये हिरीरीने भाग घेतला. उद्घाटनपर कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेच्या शिक्षिका श्रीमती गर्जे एस.डी.यांनी केले. सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका श्रीमती फुके डी.एन. व श्री गाडेकर के.बी. यांनी तर आभार प्रदर्शन मुळे श्री ए.टी. व श्रीमती कुलकर्णी आर. ए. यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी विद्यार्थिनी व पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## इंटरनॅशनल मॅथ ऑलिम्पियाडमध्ये किशोरी इंग्लिश स्कूलला तीन गोल्ड मेडल

बीड । प्रतिनिधी

किशोरी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी इंटरनॅशनल मॅथ ऑलिम्पियाड () परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर डंका वाजवला आहे. नोव्हेंबर महिन्यात पार पडलेल्या या प्रतिष्ठित परीक्षेत शाळेतील एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे किशोरी इंग्लिश स्कूलचा शैक्षणिक दर्जा पुन्हा एकदा अधोरेखित झाला असून तब्बल ३ विद्यार्थ्यांनी या परिक्षेत गोल्ड मेडल पटकावले आहे. इयत्ता पहिलीतील अनय कल्याणी आदित्य सारडा या विद्यार्थाने ९२.५० टक्के गुण मिळवत आंतरराष्ट्रीय स्तरावर १५ वा तसेच झोनल स्तरावर १५ वा क्रमांक पटकावला असून शाळेतून प्रथम



ANAY KALYANI ADITYA SARDA 92.50% PERCENTAGE — RAGHAV SANDHYA SACHIN KHARDEKAR 85.00% PERCENTAGE — ANIKA POOJA DEEPAK BHALLA 89.70% PERCENTAGE

क्रमांक मिळवण्याचा मान मिळवला आहे. इयत्ता पहिलीतीलच राघव संध्या सचिन खर्डेकर याने ८५ टक्के गुणांसह आंतरराष्ट्रीय स्तरावर ११४ वा आणि झोनल स्तरावर १०१ वा क्रमांक मिळवत शाळेतून द्वितीय क्रमांक पटकावला आहे.इयत्ता तिसरीतील विद्यार्थिनी अनिका पूजा दीपक भल्ला हिने ८९.७० टक्के गुण मिळवत आंतरराष्ट्रीय स्तरावर ७५० वा आणि झोनल स्तरावर ५५० वा क्रमांक पटकावला असून शाळेतून प्रथम क्रमांक मिळवत शाळेच्या यशात मानाचा वाटा उचलला आहे. या यशाबद्दल शाळेच्या संचालिका डॉ. अदिती सारडा यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेच्या प्राचार्या मेघा बिर्ला तसेच गणित विषयाच्या शिक्षिका काजल मालपाणी यांच्या मार्गदर्शन व मेहनतीचे विशेष कौतुक करण्यात आले.या घवघवीत यशामुळे किशोरी इंग्लिश स्कूलचे शैक्षणिक कार्य, विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता आणि शिक्षकांचे समर्पित योगदान पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

## सेवानिवृत्त शिक्षक श्रीमंतराव ढेरे याचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

तवलवाडी येथील ज्येष्ठ सेवानिवृत्त शिक्षक श्रीमंतराव ढेरे यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ९२व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे तवलवाडी गावासह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून शोककळा पसरली आहे. सकाळी दहा वाजता तवलवाडी गावातील त्यांच्या शेतामध्ये अंत्यविधी करण्यात आला.

श्रीमंतराव ढेरे हे शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत राहिलेले, शिस्तप्रिय व विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत आदराचे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. अनेक पिढ्यांना घडविणाऱ्या या आदर्श शिक्षकाच्या जाण्याने गावाने एक मार्गदर्शक गमावला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा सेवकाल जास्तीचा पांढरी गावात गेला पांढरी गावाबरोबर तवलवाडी वाळुंज देवी निमगाव येथे त्यांनी आपली सेवा घालवली.त्यांचे थोरले चिरंजीव चंद्रकांत ढेरे आष्टी शहरात वैद्यकीय सेवेत कार्यरत आहेत तर, सुनबाई जिल्हा परिषद शिक्षिका आहेत.

दरम्यान, तवलवाडी गावामध्ये स्मशानभूमी नसल्याने शेतात अंत्यसंस्कार करण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. ही बाब अत्यंत क्लेशदायक असून ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांच्या अभावाचे वास्तव अधोरेखित करते. स्मशानभूमीचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असताना देखील अद्याप ठोस निर्णय न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. किमान अंत्यसंस्कारासाठी तरी सन्मानजनक व्यवस्था उपलब्ध व्हावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अंत्यविधीस आमदार सुरेश धस माजी उपसभापती आजिनाथ सानप जिल्हा परिषद सदस्य सतीश शिंदे, डॉक्टर्स सगे सोयरे व्यापारी मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# आमच्याकडे काहीच नाही; सगळं कागदावरच!

## जिल्हा परिषद शाळेतील चिमुकलीने थेट अजित पवारांना लिहिलं हृदयद्रावक पत्र

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परभणी केसापुरी येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या अंकिता कवचट या चिमुकल्या विद्यार्थिनीने थेट राज्याचे उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजित पवार यांना लिहिलेलं पत्र सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. शाळेतील मूलभूत सुविधांचा अभाव, कागदोपत्री खर्च आणि प्रत्यक्ष वास्तव यातील तफावत तिने अतिशय धाडसाने या पत्रातून मांडली आहे. सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुलभुत असुविधा आणि शाळेच्या दुरावस्था याविषयी वारंवार आंदोलने करून पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांचे लक्ष वेधले आहे.आता या चिमुकल्या मुलीचा आर्त टाहो दादा ऐकतील काय? आणि बीड जिल्ह्यातील शाळेची दुरावस्था संपुष्टात येईल का हा खरा प्रश्न आहे अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली.

हे पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांची दयनीय अवस्था पुन्हा एकदा समोर आली असून प्रशासनासमोर गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत.

मूलभूत सुविधांचा अभाव

अंकिताने आपल्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे,
शाळेत स्वच्छ पिण्याचे पाणी नाही,
स्वच्छतागृहांची दुरवस्था आहे,



वर्गखोल्यांमध्ये बसण्याची योग्य सोय नाही,
खेळाचे साहित्य, शैक्षणिक साधने उपलब्ध नाहीत.

कागदावर मात्र पाणी फिल्टर, खेळाचे साहित्य, प्रोजेक्टर आदींसाठी लाखो रुपयांचा खर्च दाखवण्यात आल्याचा आरोप तिने केला आहे. प्रत्यक्षात मात्र विद्यार्थ्यांना काहीच मिळालेलं नाही, असं तिचं म्हणणं आहे.

''आम्हालाही स्वप्न पाहायचं आहे''

पत्रात अंकिताने भावनिक शब्दांत म्हटलं आहे की,

''आम्ही काय आयुष्यभर ऊसतोड मजूरच बनायचं का?

आम्हालाही डॉक्टर, शिक्षक, अधिकारी व्हायचं आहे.

पण शाळेतच सोय नसेल तर पुढे कसं जायचं?''

शिक्षकवर्गाबद्दल तिने कृतज्ञता व्यक्त करताना, शिक्षक चांगले आहेत, पण व्यवस्थाच अपयशी ठरत असल्याचं स्पष्ट केलं आहे.

प्रश्न कायम


एका लहानशा विद्यार्थिनीने धैर्याने थेट उपमुख्यमंत्र्यांपर्यंत आपली व्यथा पोहोचवणे हे कौतुकास्पद असले, तरी या पत्रामुळे ग्रामीण शाळांमधील कथित भ्रष्टाचार, दुर्लक्ष आणि प्रशासनाची उदासीनता उघड झाली आहे.

आता खरा प्रश्न हा आहे की पालकमंत्री अजितदादा पवार या 'लाडक्या बहिणीच्या लाडक्या भाचीला' न्याय देतील का? आणि परभणी केसापुरीच्या चिमुकल्यांचं भविष्य बदलणार का? असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

# राज्यातील पहिल्या रेशीम कोष बाजारपेठेस प्रशासकीय मान्यता

## ३ कोटी ८८ लाखांचा निधी मिळणार

पुणे : एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत राज्यातील रेशीम शेती व त्यावर आधारीत पुरक उद्योगाचा सर्वकष विकास व्हावा तसेच, पूर्व विदर्भातील टसर रेशीम शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या रेशीम कोषास योग्य दर मिळावा म्हणून शासकीय टसर रेशीम कोष बाजारपेठ व अनुषंगीक सोईसुविधा उभारण्यासाठी येणाऱ्या ३ कोटी ८८ लाख ०८ हजार इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.



काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच, विस्तृत नकाशा यास वास्तुविशारदांकडून मंजुरी घेऊनच काम सुरु करावे. ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदींबाबत काम करतेवेळी त्याचे सविस्तर विस्तृत अंदाजपत्रक तयार करुनच काम हाती घ्यावे. प्रकल्पस्थळी बांधकाम सुरु करण्यापुर्वी स्थानिक संस्थाकडून आवश्यक त्या वैधानिक परवानग्या घेण्यात याव्यात. नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात याव्यात. स्थापत्य कामाच्या कालावधीतच विद्युतीकरणाबाबतचे तसेच, इतर अनुषंगीक कामाचे योग्य नियोजन करुन सदर कामे पूर्ण करावीत. इमारतीमध्ये दिव्यांगाकरिता उपलब्ध करुन द्यावयाच्या विशेष सोयीबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. विषयांकित कामाकरिता सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता लागणार नाही यादृष्टीने विशेष दक्षता घेऊन काम करण्यात यावे.

फर्निचरच्या बाबी तसेच, मांडणीबाबत उपभोक्ता विभागाच्या वतीने संचालक (रेशीम) यांची मान्यता घेतल्यानंतरच निविदा कार्यवाही करावी. टसर रेशीम कोष बाजारपेठ व अनुषंगिक सोई सुविधांच्या उभारणीनंतर व्यवस्थापन व त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चाची तरतूद योग्य त्या योजनेखाली करण्याची जबाबदारी संचालक (रेशीम) यांची राहील. सदर बाजारपेठ उभारणीबाबतची निविदा प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण करुन अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करावे. केंद्रीय रेशीम मंडळ, बंगळूरु यांच्या अंतर्गत टसर रेशीम संशोधन व प्रशिक्षण संस्था व राज्य शासनाच्या टसर रेशीम कोष बाजारपेठ उभारणी संदर्भातील मार्गदर्शक सुचनेनुसार संचालक (रेशीम) यांनी कार्यवाही करावी. या कामकाजाकरिता उपलब्ध करुन दिलेल्या निधीचा विनियोग त्याच कामासाठी करण्याची तसेच, निधीचे विनियोग प्रमाणपत्र शासनास सादर करण्याची दक्षता संचालक (रेशीम) यांनी घ्यावी. टसर रेशीम कोष बाजारपेठ व अनुषंगीक कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी संचालक (रेशीम) यांची राहील.

# ज्वारीचे उत्पादन वाढवण्यासाठी करा 'या' फवारण्या ठरतील गेमचेंजर



ज्वारी हे महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात लागवड होणारे महत्त्वाचे तृणधान्य पीक आहे. कमी पाण्यातही चांगले वाढणारे आणि पोषणमूल्यांनी समृद्ध असल्यामुळे ज्वारीला विशेष महत्त्व आहे. पण या पिकावर कीटकांचा वाढता प्रादुर्भाव शेतकऱ्यांसाठी चिंता वाढवत आहे. योग्य वेळी प्रतिबंधात्मक उपाय न केल्यास उत्पादनावर मोठा परिणाम होतो आणि आर्थिक नुकसान होऊ शकते. ज्वारी पिकावर आढळणाऱ्या मुख्य कीटकांमध्ये कणखजूर किड, खोडमाशी, मावा आणि लष्करी अळी यांचा समावेश होतो.

कणखजूर किड : ही किड प्रामुख्याने पेरणीनंतर सुरुवातीच्या अवस्थेत पिकावर हल्ला करते. यामुळे रोपाचा मध्यभाग सुकतो आणि ''डेड हार्ट'' लक्षण दिसते. परिणामी रोपाची वाढ थांबते आणि उत्पादनावर थेट परिणाम होतो. खोडमाशी आणि फॉल आर्मीवर्म : खोडमाशी किंवा फॉल आर्मीवर्म पिकाच्या खोडात व दाण्यात हल्ला करून उत्पादन कमी करतात. या किडींचा प्रादुर्भाव वाढल्यास दाण्याची संख्या आणि दर्जा दोन्ही घटतात.

मावा : मावा पिकाच्या पानांवर येऊन रस शोषतो. त्यामुळे पान लालसर किंवा वाकलेले दिसतात आणि पिकाची वाढ मंदावते. या सर्व कीटकांच्या हल्ल्यामुळे ज्वारीचे दाणे पूर्ण भरत नाही, कणसाची गुणवत्ता कमी होते आणि उत्पादनात लक्षणीय घट होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळेवर प्रतिबंधात्मक उपाय करणे अत्यंत गरजेचे आहे.शास्त्रीय उपाय कोणते? फॉल आर्मीवर्म किंवा खोडमाशीसाठी क्लोरॅन्ट्रानिलिप्रोल १८.५% ०.४ मिली/लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पिकावरील बुरशीजन्य रोग, जसे की करपा किंवा पानावरील डाग, नियंत्रणासाठी मॅन्कोझेब ७५% २ ग्रॅम/लिटर किंवा प्रोपिकोनाझोल १ मिली/लिटर फवारणी उपयुक्त ठरते.हे उपाय वेळेवर केल्यास ज्वारी पीक निरोगी राहते, उत्पादन वाढते आणि दाण्याचा दर्जा सुधारतो. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न सुरक्षित राहते.

# शेळ्यांसोबत करा कुक्कुटपालन, कमी खर्चात होईल उत्पन्न दुप्पट!

पशुपालन हा उत्तम जोडव्यवसाय आहे. पण काही जोडव्यवसाय एकमेकांना पूरक सुद्धा असतात. हे व्यवसाय एकत्रित केल्यावर शेतकऱ्यांना फायदा होऊन त्यांचे उत्पन्न सुद्धा वाढते. असाच एक पशुपालनातील पूरक व्यवसाय आहे शेळी-कुक्कुटपालन.

शेतकऱ्यांनी शेळ्यांसोबत कोंबडी पाळल्यास त्यांचा खर्च कमी होतो आणि नफा वाढतो. शेळ्यांसोबत कोंबडी पाळल्याने खर्च निम्म्यावर येतो आणि अंडी आणि कोंबडीचे मांस सुद्धा मिळते. अशा प्रकारे पशुपालक कमी खर्चात चांगला नफा मिळवू शकतात. शेळीपालन ग्रामीण अर्थव्यवस्थेत विशेष महत्त्वाचे आहे, कारण ते अनेक लोकांसाठी कमाईचे मुख्य साधन आहे. परंतु शेतकऱ्यांनी शेळ्यांसोबत कोंबडी पाळल्यास त्यांचा खर्च कमी होऊन नफाही वाढतो. देशभरातील अनेक शेतकरी अजूनही गायी, म्हशी आणि शेळ्यांसोबत कोंबडी पाळत आहेत. शेळ्यांसोबत कोंबडी पाळल्याने खर्च निम्म्यावर येतो. अशा प्रकारे पशुपालक कमी खर्चात चांगला नफा मिळवू शकतात. शेळीचे शेण आणि कोंबडीची विष्ठा वापरून शेतकरी सेंद्रिय खत निर्माण करू शकतात.



कोंबड्या आणि शेळ्यांचे एकत्र पालन : एकत्र कुक्कुटपालन आणि शेळीपालनासाठी, सर्वप्रथम एक विशेष प्रकारचे शेड तयार करावे लागेल ज्यामध्ये कोंबड्या आणि शेळ्या एकत्र राहू शकतील. या शेडचे दोन भाग करण्यासाठी मधोमध लोखंडी जाळी लावून कोंबड्यांना बाहेर येण्यासाठी छोटा दरवाजा करावा. शेळ्यांना चरण्यासाठी बाहेर घेऊन शेडमध्ये साफसफाईसाठी जाताना जाळीत बसवलेले छोटे गेट उघडले पाहिजे. गेट उघडल्यानंतर कोंबड्या शेळ्यांच्या जागी येतात. शेळ्यांच्या शेडमध्ये उरलेला चारा कोंबड्या मोठ्या उत्साहाने खातात.


कोंबडीच्या खाद्याच्या किमतीत कपात : शेळ्यांना बरसीम, कडुनिंब, सायकमोर, जामुन आणि पेरू यांसारखा हिरवा चारा तसेच औषधी मुल्याचा चारा दिला जातो, ज्यामुळे शेळ्यांना अनेक मोठ्या आजारांपासून संरक्षण मिळते. शेळ्यांनी खाऊन उरलेला चारा फेकून दिल्यानंतर कोंबड्या खातात. कोंबडी एका दिवसात ११० ते १३० ग्रॅम धान्य खाते. त्याचबरोबर कोंबड्या आणि शेळ्यांचे पालन केल्याने कोंबडीच्या खाद्याचा खर्च ३० ते ४० ग्रॅमने कमी होतो.

कार्बन डायऑक्साइडच्या माध्यमातून कंपोस्ट खत निर्मिती : एक एकरावर शेळ्यांसोबत कोंबड्या पाळल्या तर शेळ्यांच्या खतापासून कंपोस्ट खतही तयार करता येईल. हे तयार केलेले कंपोस्ट तुम्ही शेळ्यांसाठी चारा निर्मितीसाठी वापरू शकता. याद्वारे पूर्णपणे सेंद्रिय चारा पिकवू शकाल. याशिवाय तुम्ही या कंपोस्टपासून चांगल्या प्रथिनांसह अ‍ॅझोला देखील वाढवू शकता.

# पिकांना किडींपासून वाचवण्यासाठी जैविक पद्धत

धान्य, फळे, भाज्या यांची उत्पादकता आणि गुणवत्तेमध्ये कीटकांमुळे होणारे नुकसान नियंत्रित करण्यासाठी शेतकऱ्यांकडून जास्त प्रमाणात विषारी रसायनांचा वापर केला जात आहे. ज्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या जसे कीटकांमध्ये कीटकनाशकांचा वाढता प्रतिकार, नैसर्गिक शत्रू कीटकांवर प्रतिकूल परिणाम आणि परागकण करणारे कीटक आणि फायदेशीर कीटक, रसायनांद्वारे मानवी आरोग्यावर वाईट परिणाम, जमिनीची खराब गुणवत्ता इ.आपल्या देशातील पंजाब राज्यात रासायनिक कीटकनाशकांचा कहर खूपच वाढला आहे आणि कर्करोगासारख्या भयंकर रोगामुळे ग्रस्त आहे. या प्रकारच्या समस्येवर मात करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे सेंद्रिय शेती किंवा रासायनिक मुक्त पद्धतींनी कीटकांचे व्यवस्थापन करणे.

पंचगव्य : पंचगव्याचे शेतीमध्ये अत्यंत प्रभावी आहे. गोमूत्र, शेण, दही, दूध आणि तूप यासारख्या गाईपासून मिळवलेले ५ पदार्थ मिसळून पंचगव्य तयार केले जाते.पंचगव्य हे एक सेंद्रिय उत्पादन आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचे रसायन वापरले जात नाही. वनस्पतींना




नुकसान पोहोचवणाऱ्या कीटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी हे कीटकनाशक म्हणून वापरले जाते.

मट्ठा : मठ्ठा, ताक, दही इत्यादी नावांनी ओळखले जाणारे हे उत्पादन कीटक नियंत्रणामध्ये देखील महत्वाची भूमिका बजावते.मिरची, टोमॅटो इत्यादी पिकांमधील कीड आणि रोगांच्या प्रतिबंधात ते अधिक प्रभावी असल्याचे सिद्ध झाले आहे. १०० ते १५० मिमी ताक १५ लिटर पाण्यात विरघळते आणि फवारणी नियंत्रित होते. हे उपचार स्वस्त आणि सोपे आहे, ते सुद्धा कोणत्याही प्रकारच्या पर्यावरण प्रदूषणाशिवाय.

गौमूत्र : तुम्ही काचेच्या बाटलीत गोमूत्र भरून उन्हात ठेवू शकता. गोमूत्र जितके जुने असेल तितके ते प्रभावी होईल. १२ ते १५ मि.मी एक लिटर पाण्यात मिसळलेले गोमूत्र स्प्रेअरच्या साहाय्याने पिकांवर फवारले जाते, ज्यामुळे झाडांमध्ये कीटकांचा प्रतिकार होतो, ज्यामुळे कीटकांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता कमी होते.

भू-परिष्करण क्रिया : जमीन शुद्धीकरणाच्या प्रक्रियेत ,जमिनीची खोल नांगरणी केली जाते. ज्यामुळे कीटकांच्या जमिनीच्या आत तयार झालेले अनेक टप्पे वरती येतात आणि नंतर ते पक्षांद्वारे पकडले जातात आणि खाल्ले जातात.

पीक रोटेशन : शेतात एकाच जातीची एकाच पिकाची किंवा पिकांची एकाच ठिकाणी किंवा परिसरात सतत पेरणी करून, त्यामध्ये कीटकांचा प्रादुर्भाव दरवर्षी वाढतो, कारण कीटकांना सतत अन्न मिळत राहते. म्हणून, पीक रोटेशनचा अवलंब करून, पिकांची वैकल्पिकरित्या पेरणी करतात , ज्यामुळे कीटकांचा प्रादुर्भाव कमी होऊ शकतो.

ट्रॅप पिके : या लावण पद्धतीमुळे, मुख्य पीक कीटकांच्या हल्ल्यापासून वाचवता येऊ शकते, उदाहरणार्थ, एका ओळीत झेंडू आणि १६ ओळींमध्ये टोमॅटोची रोपे , जेणेकरून कीटक टोमॅटोकडे न येता झेंडूवर येतात.

पेरणीची वेळ : वेळेवर लवकर पेरणी केल्यास किडींमुळे होणारे नुकसान टाळता येते, जसे की हरभरा लवकर पेरल्यास हरभरा अळीचा प्रादुर्भाव कमी होऊ शकतो आणि त्याचप्रमाणे मोहरीची लवकर पेरणी केल्यास महू किडीचा हल्ला कमी होऊ शकतो.

कीट प्रतिरोधी : प्रतिरोधक वाण हे असे प्रकार आहेत ज्यात कीटकांचा प्रादुर्भाव नसतो किंवा कमी प्रवण असतो किंवा कीटकांचा उपद्रव सहन करण्याची क्षमता असते. अशा प्रकारे, आपण कोणत्याही रसायनांचा वापर न करता प्रतिरोधक जातींचा वापर करून कीटकांचा प्रादुर्भाव कमी करू शकतो.

निकोटीन : तंबाखूच्या सुमारे १५ जातींमधून निकोटीन मिळते. तंबाखूच्या पानांची पावडर बनवून पाण्यात विरघळवून त्याचा वापर केला जातो. हे कीटकांच्या शरीरात प्रवेश करते आणि त्याच्या मज्जासंस्थेवर परिणाम करते, ज्यामुळे कीटकांना अर्धांगवायू होतो आणि काही काळानंतर कीटक मरतो. ते महू किडीच्या नियंत्रणासाठी वापरले जातात.

कडुनिंबाची उत्पादने : कडुनिंबाचे बियाणे आणि कडुलिंबाच्या बियाण्यांचा अर्क प्रामुख्याने कीटकांचा चावणे आणि चावणे नियंत्रित करण्यासाठी वापरला जातो. १० ते १२ किलो कडुनिंबाची पाने २०० लिटर पाण्यात ४ दिवस भिजवून ठेवा. जेव्हा पाणी हिरवे-पिवळे असते, तेव्हा ते फिल्टर करून १ एकर पिकावर फवारणी केल्यास अळी टाळता येतात.मिरची आणि लसूण : ५०० ग्रॅम हिरवी मिरची आणि ५०० ग्रॅम लसूण बारीक करून चटणी बनवा आणि पाण्यात द्रावण तयार करा, नंतर ते गाळून घ्या आणि १०० लिटर पाण्यात विरघळवा, अशा पद्धतीने पिकावर कीटक नियंत्रण करा.




## जागतिक दिवस
## राष्ट्रीय कुष्ठारोग प्रतिबंध अभियान दिवस

### महत्वाच्या घटना

१५६५ : विजयनगर साम्राज्याची अखेर
१७०८ : छत्रपती शाहू महाराजांनी स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला. त्याच दिवशी सातारा ही राज्याची नवी राजधानी जाहीर केली गेली.
१७९३ : आजच्या दिवशी ह्यूमन सोसाइटी ऑफ़ फिलाडेल्फिया ला संघटीत केल्या गेले.
१८४९ : डॉ. एलिझाबेथ ब्लॅकवेल ही वैद्यकशास्त्रातील पहिली महिला पदवीधर बनली.
१९२७ : मॅडलिन ऑलब्राई ह्या अमेरिकेच्या पहिल्या महिला परराष्ट्र मंत्री बनल्या.
१९३२ : 'प्रभात'च्या 'अयोध्येचा राजा'ची हिन्दी आवृत्ती ' अयोध्याका राजा' मुंबईत प्रदर्शित झाली.
१९४३ : दुसरे महायुद्ध - ब्रिटिश सैन्याने त्रिपोली (लिबीयाची राजधानी) शहर जिंकले.
१९६६ : आजच्या दिवशी इंदिरा गांधी देशाच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री बनल्या.
१९६८ : शीतयुद्ध उत्तर कोरियाने अमेरिकेची यू. एस. एस. प्युएब्लो ही युद्धनौका ताब्यात घेतली.
१९७३ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी व्हिएतनाम बरोबर शांतता करार झाल्याचे जाहीर केले.
१९७७ : जयप्रकाश नारायण यांनी जनता पार्टी ची स्थापना केली.
१९९७ : मॅडलिन ऑलब्राईट या अमेरिकेच्या पहिल्या महिला परराष्ट्रमंत्री बनल्या.
२००२ : वॉल स्ट्रीट जर्नलचा पत्रकार डॅनिअल पर्ल याचे कराचीतुन अपहरण
२००२ : ला भारतीय उपग्रह इनसेट-३सी ला प्रक्षेपित केल्या गेले.
२००९ : ला टेलिव्हिजन कार्यक्रमांमध्ये धुम्रपानाच्या दृश्यांवरून बंदी हटवल्या गेली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१४ : सर अलेक्झांडर कनिंगहॅम - भारतातील पुरातत्त्व संशोधनाची मुहूर्तमेढ करणारे ब्रिटिश अधिकारी (मृत्यू: २८ नोव्हेंबर १८९३)
१८९७ : नेताजी सुभाषचंद्र बोस (मृत्यू: १८ ऑगस्ट १९४५ फोर्मोसा, तैवान)
१८९८ : पं. शंकरराव व्यास - गायक व संगीतशिक्षक, पं. विष्णू दिगंबर पलुसकर यांचे शिष्य (मृत्यू: १७ डिसेंबर १९५६)
१९१५ : कमलनयन बजाज - उद्योगपती, जमनालाल बजाज यांचे चिरंजीव, बजाज आटो, बजाज इलेक्ट्रिकल्स, उदयपूर सिमेंट इ. कंपन्यांचे अध्यक्ष (मृत्यू: १ मे १९७२)
१९२० : श्रीपाद रघुनाथ जोशी - व्यासंगी लेखक (मृत्यू: २००२)
१९२६ : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे (मृत्यू: १७ नोव्हेंबर २०१२)
१९३० : साहित्यामध्ये नोबेल पुरस्कार विजेते असलेले डेरेक वॉलकोट यांचा जन्म.
१९३४ : सर विल्यम हार्डी - ब्रिटिश जीवरसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ६ एप्रिल १८६४)
१९४७ : मेगावती सुकार्नोपुत्री - इंडोनेशियाच्या पहिल्या महिला राष्ट्राध्यक्ष
१९८७ : भारतीय चित्रपट कलाकार दुष्यंत वाघ चा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६४ : शहाजी राजे भोसले यांचे कर्नाटकातील होदेगिरीच्या जंगलात शिकार करताना घोडा अडखळून पडल्याने अपघाती निधन (जन्म: १८ मार्च १५९४)
१९१९ : राम गणेश गडकरी - नाटककार, कवी व विनोदी लेखक. ते 'गोविन्दाग्रज' या टोपणनावाने कथालेखन करीत तर 'बाळकराम' या नावाने विनोदी लेखन करीत. (जन्म: २६ मे १८८५)
१९३१ : ॲना पाव्हलोव्हा - 'द डाइंग स्वान' म्हणून प्रसिद्ध असलेली रशियन बॅलेरिना (जन्म: १२ फेब्रुवारी १८८१)
१९५९ : विठ्ठल नारायण चंदावरकर - शिक्षणतज्ञ आणि कायदेपंडित.
१९६३ : ला भारतीय स्वातंत्र्य सैनिक नरेंद्र मोहन सेन यांचे निधन.
१९८९ : साल्वादोर दाली - स्पॅनिश चित्रकार. विसाव्या शतकात पिकासोच्या खालोखाल प्रसिद्धी व लोकप्रियता मिळवलेले चित्रकार म्हणून ते ओळखले जातात. (जन्म: ११ मे १९०४)
१९९२ : ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर - भक्तिसांप्रदायिक आणि ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक.
२०१० : पं. दिनकर कैकिणी - शास्त्रीय गायक (जन्म: २ आक्टोबर १९२७)
२०१५ : ला सौदी अरेबियाचे राजे अब्दुल्ला यांचे निधन.

# तरुणावर जीवघेणा हल्ला, तिघांना जन्मठेपेची शिक्षा

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

जुना वाद मिटवायचा असल्याचे सांगत एका तरुणाला बोलावून त्याला क्रिकेट बॅट, लोखंडी रॉड व काठ्यांनी जीवघेणा हल्ला करुन गंभीर जखमी केल्याप्रकरणी तिघा आरोपींना जन्मठेप व प्रत्येकी २० हजार रुपये दंडाची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायाधीश एन.एम. जमादार यांनी ठोठावली.



शेख अझहर शेख कादर (१८, रा. गणेशनगर, पडेगाव), अजय नानासाहेब मस्के (१८) आणि आकाश सखाराम मस्के (२३, दोघे रा. सैलानीनगर, पडेगाव) अशी आरोपींची नावे आहेत. ही घटना १० जुलै २०१८ रोजी सायंकाळी पडेगाव येथील नवकार यश हौसिंग सोसायटीसमोरील शॉपिंग कॉम्प्लेक्स परिसरात घडली होती. प्रकरणात प्रमोद रामकृष्ण हिरवडे (४४, रा. मिटमिटा) यांनी फिर्याद दिली होती. त्यानुसार, फिर्यादीचा मुलगा सागर हिरवडे याला जुना वाद मिटवायचा असल्याचा फोन करून आरोपींनी बोलावून घेतले. त्यानुसार सागर गेला असता तेथे आधीच दबा धरून बसलेल्या आरोपी व त्यांच्या साथीदारांनी सागरला मारहाण केली. एका विधिसंघर्षग्रस्त बालकाने क्रिकेट बॅटने सागरच्या डोक्यावर जोरदार वार केला. सागर खाली कोसळताच, आज सागरला जिवंत ठेवू नका, असे म्हणत अझहर शेख याने लोखंडी रॉडने त्याच्या हातावर वार केला. उर्वरित आरोपींनी काठ्यांनी बेदम मारहाण केली. या हल्ल्यात सागर गंभीर जखमी झाला. प्रकरणात छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खटल्याच्या सुनावणीवेळी सहायक सरकारी लोकाभियोक्ता एन.बी. धोंगडे व एन.आर. कहाणे यांनी जखमीची थेट साक्ष, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. वैद्यकीय पुरावे, जप्त केलेला लोखंडी रॉड तसेच फॉरेन्सिक अहवाल सादर करण्यात आले. डॉक्टरांच्या साक्षीत सागरच्या शरीरावर एकूण बारा जखमा असून त्यातील डोक्यावरील जखमा प्राणघातक असल्याचे स्पष्ट झाले. न्यायालयाने आपल्या निकालात स्पष्ट केले की, या प्रकरणात पाचपेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश होता. सागरला बोलावण्यापूर्वीच हल्ल्याचे नियोजन करण्यात आले होते. क्रिकेट बॅट, लोखंडी रॉड आणि काठ्या ही प्राणघातक शस्त्रे असून त्यांचा वापर करून डोक्यावर व हातावर वार करण्यात आले, त्यामुळे खुनाचा प्रयत्न झाल्याचे सिद्ध होते. न्यायालयाने असेही नमूद केले की, प्रत्यक्ष वार कुणी केला यापेक्षा आर- ोपींनी सामूहिक हेतूने गुन्हा केला. त्यामुळे भारतीय दंड विधानाच्या कलम १४९ नुसार सर्व आरोपी समानरीत्या दोषी ठरतात. गुन्ह्यानंतर वापरलेली शस्त्रे लपवून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचेही पुराव्यांतून स्पष्ट झाले.

जखमी मुलाला नुकसानभरपाई


खुनाच्या प्रयत्नासाठी तिघा आरोपींना जन्मठेप व विविध कलमांखाली प्रत्येकी २० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली असून सर्व शिक्षा एकत्रितपणे भोगायच्या आहेत. विशेष म्हणजे, आरोपींना ठोठावण्यात आलेल्या दंडाची रक्कम जखमी मुलाला नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## जलनायक मयंक गांधींच्या संकल्पनेतून सिरसाळ्याचा होणार कायापालट!

### रस्ता सुशोभीकरणातून गावाला मिळणार नवी ओळख

परळी। प्रतिनिधी

परळी वैजनाथ तालुक्यातील सिरसाळा हे मोठी लोकवस्ती असलेले प्रमुख गाव असून, येथे तालुक्यातील सर्वात मोठा आठवडी बाजार भरतो. या बाजारपेठेमुळे सुमारे ६० ते ६५ गावांचा हा परिसराचा केंद्रबिंदू ठरतो. सिरसाळापोहनेर हा गावातून जाणारा प्रमुख व वर्दळीचा रस्ता असून, त्याच्या सुशोभीकरणाचे काम जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून ग्लोबल विकास ट्रस्टने हाती घेतले आहे. या उपक्रमामुळे गावाला एक नवी आणि आकर्षक ओळख मिळणार आहे. सिरसाळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते ईदगाह चौक या मुख्य मार्गावरील दुभाजकावर ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने वृक्षारोपण करण्यात येत आहे.




रस्त्यावरील खड्डे आणि उडणाऱ्या धुळीमुळे नागरिक व व्यापाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे या मार्गाचे सुशोभीकरण करून वृक्षारोपण करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी जलनायक मयंक गांधी यांच्याकडे केली होती. त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत ग्लोबल विकास ट्रस्टने पुढाकार घेतला आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे ३०० मीटर लांबीच्या रस्त्याच्या दुभाजकावर पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. नव्या वृक्षलागवडीमुळे रस्त्याचे आणि गावाचे सौंदर्य वाढणार असून, सिरसाळ्याला एक हरित आणि स्वच्छ ओळख मिळणार आहे. त्यामुळे ग्रामस्थ आणि व्यापारी वर्गात समाधान व्यक्त केले जात आहे.

ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आम्ही शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि त्याचबरोबर पर्यावरण संवर्धन साधणे, या दुहेरी उद्देशाने काम करत आहोत. संस्थेच्या वतीने आजपर्यंत ७ कोटींपेक्षा अधिक फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. सिरसाळा येथील रस्त्याचे सुशोभीकरण करताना झाडांची लागवड व त्यांचे संवर्धन यासाठीही विशेष उपाययोजना केल्या जातील. मात्र, ''स्वच्छ सिरसाळा, हरित सिरसाळा'' हा मूलमंत्र लक्षात ठेवून ग्रामस्थांनी आणि व्यापाऱ्यांनी या उपक्रमाला लोकचळवळीचे स्वरूप द्यावे, असे आवाहन ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांनी केले आहे.

## श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावरील ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व लाभलेल्या लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थानच्या वतीने गणेश जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत श्रीमत गणेश महापुराण कथा तसेच पंचकुंडी गणेश यज्ञ यास दि. १६ जानेवारी शुक्रवारपासून विधिवत प्रारंभ झाला असून परिसरात भक्तिभाव व अध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे. देवस्थान समितीच्या वतीने दरवर्षी गणेश जयंतीनिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.



आज दि. २२ गुरुवार रोजी सकाळी मन्मथ स्वामी संस्थानचे मठाधिपती व सुप्रसिद्ध प्रवचनकार डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांच्या शुभहस्ते भाविक भक्तांच्या उपस्थितीत गणेश जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाराजांनी श्री गणेश जन्मकथेचे सविस्तर वर्णन करून प्रवचनातून भक्तांना अध्यात्मिक मार्गदर्शन केले. या धार्मिक सोहळ्याची सांगता उद्या दि. २३ शुक्रवार रोजी ह.भ.प. धर्मराज दादा सामनगावकर यांच्या सुश्राव्य व भावस्पर्शी कीर्तनाने होणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## कायदा, सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवा – जिल्हाधिकारी

लातूर। प्रतिनिधी

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी व निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात याव्यात अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी येथे दिल्या.

निवडणूक काळातील कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सामान्य प्रशासनच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आदर्श आचारसंहिता कक्षाचे नोडल अधिकारी असलम तडवी, निवडणूक खर्च संनियंत्रण कक्षाचे नोडल अधिकारी राजेंद्र नागणे, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक केशव राऊत उपस्थित होते. तसेच सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, तहसीलदार व उपविभागीय पोलीस अधिकारी हे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

## आकांक्षित तालुका कार्यक्रमाबाबत आढावा बैठक संपन्न

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यातील बदनापूर व परतुर या दोन तालुक्यांचा समावेश आकांक्षित तालुका योजना राबविण्यात येत असून या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना श्रीमती पी. एम.मिन्नू यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत तालुकास्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध विकासात्मक उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीस जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी, शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती संगीता भागवत, गटविकास अधिकारी परतुर गटविकास अधिकारी बदनापूर श्रीमती ज्योती राठोड, गटशिक्षणाधिकारी परतुर भरत वानखेडे, बदनापूर क्षिरसागर, यांच्यासह अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. श्रीमती पी. एम. मिन्नू यांनी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून निश्चित उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ पोहोचला पाहिजे, यावर विशेष भर देण्यात आला. आकांक्षित तालुक्यातील शाळा व अंगणवाड्यामध्ये प्राधान्याने मुलां-मुलींसाठी शौचालयाची कामे पूर्ण करावीत. तसेच सर्व ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी देखील शौचालय स्वच्छता व कामे पूर्ण करणेबाबत निर्देश दिले. बैठकीत आरोग्य, पोषण, शिक्षण, कृषी, पिण्याचे पाणी, स्वच्छता, महिला व बालकल्याण तसेच सामाजिक-आर्थिक विकासाशी संबंधित निर्देशांकांवर चर्चा करण्यात आली. आकांक्षित तालुक्यांमधील कामकाजाची सद्यस्थिती, प्रगती अहवाल, तसेच अद्याप प्रलंबित असलेल्या कामांबाबत संबंधित विभाग प्रमुखांकडून माहिती घेण्यात आली.

## राज्य शिक्षकेत्तर संघटनेचे ५३वे राज्यस्तरीय अधिवेशन १ फेब्रुवारीला मुबईत होणार

### जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-संजय डावकर

बीड । प्रतिनिधी

शिक्षकेत्तर महामंडळाचे ५३वे राज्यस्तरीय अधिवेशन रविवार दि.१ फेब्रुवारी रोजी लोकमान्य बाळगंगाधर टिळक मैदान, टिळक नगर, चेंबुर, मुंबई येथे आयोजित करण्यात आले आहे.

मुंबई येथे होणाऱ्या महामंडळाच्या राज्यव्यापी अधिवेशनामध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नावर विचार विनिमय, चर्चासत्र व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून या अधिवेशनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, शिक्षक आमदार विक्रम काळे, आ.जयंत आसगावकर, पदवीधर आ.निरंजन डावखरे, आ.सत्यजित तांबे, आ.ज्ञानेश्वर माने आदी मान्यवर उपस्थित राहणार असून महामंडळाचे अध्यक्ष अनिल माने, कार्यवाहक शिवाजीराव खांडेकर, मराठवाडा विभागीय अध्यक्ष संजय कावळे आदींच्या मार्गदशनाखाली संपन्न होणाऱ्या राज्यव्यापी अधिवेशनात शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती, आश्वासित प्रगती योजना पुर्वलक्षीप्रमाणे लागू करणे, अनुकंपा तत्वावरील भरती, जुनी पेन्शन योजना, वैद्यकीय रजा देयके आदी अनेक महत्वाचे प्रश्न शासन दरबारी प्रलंबित असून त्यावर सखोल चर्चा करण्यात येणार आहे.



तरी या अधिवेशनास जिल्ह्यातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन शिक्षकेत्तर संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय डावकर, उपाध्यक्ष शेख मोहसीन, संदीप वनवे, कोषाध्यक्ष रविंद्र वांगीकर, मार्गदर्शक उत्तम राठोड, बाळासाहेब सोळंके, अर्जुन सानप, दत्तात्रय आगवान, सुर्यकांत बिराजदार, दत्तात्रय डाके, बाळासाहेब सावंत, किशोर हांगे, वैभव राऊत, सुरेश करपे यांच्यासह आदींनी केले आहे.

## अपघातग्रस्तांना मदतीसाठी धावणाऱ्यांना २५ हजाराची मदत योजना सुरू करा-डॉ.तांदळे

बीड । प्रतिनिधी

रस्ते अपघातातील जखमींना कॅशलेस वैद्यकीय उपचार योजनेअंतर्गत सात दिवसांसाठी दीड लाखापर्यंत मोफत उपचार मिळणार तसेच जखमी व्यक्तींना तातडीने रुग्णालयात पोहोचणाऱ्या व्यक्तींना मदत करणाऱ्यास २५ हजार रुपयांचे बक्षीस देणार असल्याची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नुकतीच जाहीर केली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील गृह व आपत्कालीन विभाग तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण.महामार्ग अभियंता यांच्याकडे चौकशी केली असता अद्याप पर्यंत आमच्याकडे याबाबतची कोणत्याही प्रकारची माहिती किंवा जी.आर. आलेला नाही असे सांगण्यात आले. सदरील योजना लवकरात लवकर सुरू करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने दि. २२ जानेवारी २०२६ गुरुवार रोजी निवासी उपजिल्हाधिकारी सोनी साहेब यांच्याशी चर्चा करून त्यांच्या मार्फत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, सुदाम कोळेकर, बीड शहर बचाव मंचचे मार्गदर्शक प्राचार्य डी.जी. तांदळे ,अध्यक्ष नितीन जायभाये, आम आदमी पार्टीचे अध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे. शिवशक्ती भीमशक्ती विचार मंचचे अध्यक्ष प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, सामाजिक कार्यकर्त्या किस्कींदा पांचाळ आदींची उपस्थिती होती.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/७५६
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २३/१२/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) जयश्री रामप्रसाद गिल्डा सिटी सर्व्हे नं.-८३ नं.प.मि.नं.१८-५३-४८/२-१ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-५३-४८/२-१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्रविणकुमार शहा यांनी विक्री केला प्लॉट
पश्चिम : कॉलनी अंतर्गत रोड
दक्षिण- गंगाराम राउत यांचे कुटूंबियांचे घर
उत्तरः सौ. संध्या विवेक कुलकर्णी यांनी आज रोजी खरेदी केलेल घर

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/६४५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ३०/१०/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) अमोल लक्ष्मण जाधव सर्व्हे नं.-९९ सहन प्लॉट नं. २२ सिटी सर्व्हे नं. २४६९ नं.प.मि.नं.१८-१३६-२२/२ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१३६-२२/२) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- १३.५० मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : प्लॉट नं. २१
दक्षिण- रामनाथ तुळसिराम यांचा प्लॉट
उत्तरः सर्व्हे नं. १०० मधील जमीन

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

## बैलगाडा शर्यत म्हणजे शेतकरी व ग्रामीण संस्कृतीचा गौरव –बोराडे

मंठा । प्रतिनिधी

बैलगाडा शर्यत म्हणजे शेतकरी व ग्रामीण संस्कृतीचा गौरव असून ग्रामीण भागात हा ठेवा सन्मानाने जपला असे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख ए जे पाटील बोराडे यांनी केले. हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मंठा तालुक्यातील आर्डा (खारी) येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'तालुकाप्रमुख बैलगाडा शर्यत' अत्यंत अटीतटीच्या सामन्यांनी आणि थरारक वातावरणात संपन्न झाली. या शर्यतीमध्ये जिल्ह्यासह राज्यातील नामांकित अडीचशेहून अधिक बैलगाडा मालकांनी सहभाग नोंदवला होता.२ लाख २ हजार रुपयांच्या एकूण बक्षिसांच्या या जंगी मैदानात बैलगाडा शौकीनांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.



या शर्यतीचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे, शिवसेना नेते प्रल्हादराव बोराडे व तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या हस्ते झाले.या शर्यतीत प्रथम बक्षीस ५१०००/- उदयसिंह बोराडे यांच्या तर्फे, तर द्वितीय बक्षीस ४१०००/- माजी सभापती संतोषराव वरकड, तृतीय बक्षीस ३१०००/ -माजी उपसभापती किसनराव मोरे, चतुर्थ बक्षीस २१०००/- योगेश पाटील अवचार, तसेच रतन कळणे, अंबादास बोराडे, निलेश जोजरे, दिलीपराव कव्हळे, दत्तराव चव्हाण, प्रदीप अवचार यांच्यातर्फे आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती. शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे अत्यंत शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले. शर्यतीच्या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येक बैलगाडा मालकाची आणि प्रेक्षकांची विशेष काळजी घेण्यात आली.शर्यतीदरम्यान सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले. ''अशी मोठी स्पर्धा मंठा तालुक्यात पहिल्यांदाच पाहायला मिळाली,'' अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.विजेत्या बैलगाडा मालकांनी गुलालाची उधळण करत आपल्या विजयाचा आनंद साजरा केला. याप्रसंगी तुळशीराम कुहिरे, परमेश्वर उबाळे, संजय राठोड, रामराव वरकड, बाळासाहेब देशमुख, अक्षयदीप वाघमारे, विठ्ठल नानोटे, दिनकर मातने नाथा दिवटे, अमोल विरकर, विजय बागल, विकास गिराम, विनोद खरात, कृष्णा बोराडे, भगवान बोराडे, पवन वाघमारे, दादाराव खंदारे, भरत नरोटे, राम नरोटे, पप्पू बोराडे, जयदेव चव्हाण, गोपी डेंगळे, विनोद प्रधान तसेच पंचक्रोशीतील बैलगाडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंबडचे उपनगराध्यक्ष विश्वजित खरात यांचा सत्कार



बीड । प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणूकीमध्ये जालना जिल्ह्यातील अंबड नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी माजी आमदार विलासराव खरात यांचे पुत्र विश्वजीत खरात यांची बिनविरोध निवड झाली असून त्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी विश्वजीत यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

जालना जिल्ह्यातील अंबड नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी माजी आमदार विलासराव खरात यांचे पुत्र विश्वजीत खरात यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली असून विश्वजीत खरात यांनी आज शिवछत्र निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांनी त्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. अंबड तालुक्यासाठी खरात परिवाराने खूप मोठे योगदान दिले असून अंबड नगर परिषदेमध्ये विश्वजीत खरात यांच्या नेतृत्वाखाली अंबड शहराचा चेहरा मोहरा बदलेला असा विश्वास शिवाजीराव पंडित यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी भवानी अर्बन बँकेचे उपाध्यक्ष रऊफभाई, मजूर फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष रघुनाथ मोहोळकर, माजी नगरसेवक विश्वास मनसबदार, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रकाश राखा, ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र



# अवैध धंद्यावर कठोर कारवाई करा

## विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांचे कडक निर्देश

**बीड । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांनी गुरुवारी बीड जिल्हा पोलीस दलाची सविस्तर आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था, गुन्हेगारी प्रतिबंध तसेच पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा आढावा घेतला.**

बैठकीदरम्यान मालमत्तेविरुद्ध दाखल होणारे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी प्रत्येक प्रभारी अधिकारी यांनी विशेष मेहनत घ्यावी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढविणे, आरोपींचा जलद शोध घेणे व नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे यावर त्यांनी भर दिला. पोलीस स्टेशन हद्दीत जास्तीत जास्त सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था व प्रशासनाशी समन्वय साधून ठोस प्रयत्न करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या. सीसीटीव्हीमुळे गुन्हे प्रतिबंधास मदत होईल तसेच गुन्हे उघडकीस आणण्यास गती मिळेल, असे त्यांनी नमूद केले.



अवैध धंद्यांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आदेश देत अवैध गुटखा विक्री, अवैध अग्निशस्त्र बाळगणे तसेच इतर बेकायदेशीर कृत्यांवर जास्तीत जास्त कारवाया कराव्यात, असे त्यांनी सांगितले. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर, विशेषतः विना हेल्मेट वाहन चालविणारे व अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांवर नियमित व प्रभावी कारवाई करण्याचे निर्देश दिले. याच बैठकीत सन २०२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व अंमलदारांचा प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. अंतर्गत जास्तीत जास्त इसमांना स्थानबद्ध करण्याबाबत उल्लेखनीय कार्य करणारे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, शितलकुमार बल्लाळ व शरद जोगदंड यांचा सत्कार करण्यात आला. तसेच रात्रगस्त दरम्यान प्रभावी कारवाई करणारे बीड शहर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक संदिप नेवरे आणि बीड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब गुंड व अंमलदार यांनाही प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी बैठकीस विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र यांचेसह पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व जिल्ह्यातील पोलीस अधिकारी हजर होते.

# नॅशनल हायवे ५४३ डी च्या कामात 'मातीचा भराव'

## जामखेड-पाटोदा महामार्गाच्या गुणवत्तेवर जनतेचा संताप!

पाटोदा । प्रतिनिधी

जामखेड ते पाटोदा दरम्यान सुरू असलेल्या नॅशनल हायवे ५४३ डी च्या कामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता व निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. महामार्गाच्या मजबुतीकरणासाठी आवश्यक असलेल्या मुरूम व खडीऐवजी चक्क मातीचा भराव टाकून काम सुरू असल्याने या रस्त्याच्या टिकाऊपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महामार्गाच्या कामात नियमांना हरताळ फासण्यात येत असून, "मुगच खांब" म्हणजेच निकृष्ट पाया उभा केला जात असल्याची तक्रार परिसरातील नागरिकांनी केली आहे. ◀◀ पान ३ वर



### इंजिनियरवर कारवाईची मागणी

**संबंधित कामावर देखरेख करणाऱ्या अभियंत्यांच्या डोळ्यादेखत हे प्रकार सुरू असल्याने त्यांची सखोल चौकशी करून कडक कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी होत आहे. ठेकेदारांकडून मनमानी सुरू असून प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.**

### जनतेचा इशारा

**कोट्यवधी रुपये खर्च करून सुरू असलेल्या या महामार्गाच्या कामाची तातडीने वरिष्ठ पातळीवर चौकशी करून निकृष्ट दर्जाचे काम थांबवावे व दर्जेदार रस्ता तयार करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जामखेडपाटोदा परिसरातील नागरिकांनी दिला आहे.**

# माजलगाव येथे गणेश जयंतीच्या निमित्ताने अथर्वशीर्ष पठण

माजलगाव । प्रतिनिधी

श्री गणेश जयंती निमित्त परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशिर्वादाने गणपती मंदिर जुना मोंढा माजलगाव येथे दि २२ जाने गुरुवार रोजी सकाळी ठिक ०७:०० वाजता गणेश जन्मोत्सव साजरा करण्यात आला तत्पूर्वी पहाटे पाच वाजता नित्य पुजा व महाभिषेक करण्यात आला व महाआरती संपन्न झाली. यानंतर श्री स्वामी समर्थ सेवा, अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्र दिंडोरी प्रणित माजलगाव येथील बालसंस्कार विभागाच्या वतीने ग्रामाभियानांतर्गत सामुहिक श्री गणपती अथर्वशीर्ष २१ व एकुण १००८० आवर्तने घेण्यात आली. सर्व भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला या महान प्रसादाचे यजमान संजय शेजुळ व विष्णूपंत घाटुळ हे होते.



यावेळी श्री गणपती मंदिर जुना मोंढा माजलगाव या मंदिराचे विश्वस्त विष्णुभाऊ मुंदडा, जगदीश चांडक, माधवराव आबा सोळंके, मन्मथ अप्पा लांडगे, भगवान लाटे, प्रदिप रुद्रवार, प्रकाश दुगड संजय कोकड, जुगलकिशोर नावंदर, अजित भावठाणकर, रमेश चांडक, प्रकाशभाऊ दुगड, बाबासाहेब सरवदे, गणेश लोहिया, सुरेश बोराडे, रुपेश गडम, सुभाष रुद्रवार दिपक शिनगारे, ओम भुतडा, रोहित नांवदर, ओम भुतडा, दत्ता वाघमारे प्रमोद मालाणी, शिवशंकर भंडारे तसेच समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी, गणेश भक्त महिला - पुरुष गणेशभक्त, नागरिक, पत्रकार, विद्यार्थी व शेकडो भक्त उपस्थित होते.

# नगराध्यक्षा व नगरसेवकांनी प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिला शिस्तीचा संदेश

परळी । प्रतिनिधी

नगरपरिषद कार्यालयातील कामकाज अधिक शिस्तबद्ध, पारदर्शक आणि वेळेचे काटेकोर पालन करणारे व्हावे, या उद्देशाने परळी नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांनी आज एक आगळावेगळा आणि सकारात्मक उपक्रम राबवला. कर्मचाऱ्यांना सकाळी पावणेदहाची कार्यालयीन वेळ पाळावी व कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहावे, यासाठी कोणतीही दंडात्मक कारवाई न करता थेट गांधीगिरीच्या मार्गाने शिस्तीचा संदेश देण्यात आला.



नगरपरिषद कार्यालय येथे आज (दि.२२) सकाळी कार्यालयीन वेळेपूर्वीच नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्यासह सर्व नगरसेवक नगरपरिषद कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर उपस्थित राहिले. कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याचे फुल देऊन आत्मीयतेने स्वागत करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांना सन्मानपूर्वक संवाद साधत, कार्यालयीन वेळेचे काटेकोर पालन करणे, ◀◀ पान ३ वर

# तेजस अर्बन कडून धान्य तारण योजना- प्रकाश कवठेकर

बीड । प्रतिनिधी

बँकांमध्ये सोने जमीन प्लॉट आदी तारण ठेवण्याची पद्धत आहे त्या कर्जावर व्याजदर लावला जातो मात्र आता शेतकऱ्यांना आधार म्हणून बीड जिल्ह्यामध्ये तेजस अर्बन बँकेच्या वतीने शेतकऱ्यांसाठी धान्य तारण योजना खास शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आली यावर वार्षिक व्याजदर केवळ १६ टक्के ठेवण्यात आले आहे शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान तेजस अर्बनचे चेअरमन एड प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.



गेल्या काही वर्षापासून नावावर पास आलेल्या तेजस अर्बन बँकेने बीड शहरासह आष्टी पाटोदा शिरूर या तालुक्यामध्ये आपले जाळे विणले आहे खातेदार ठेवीदार यांच्यासाठी सक्षम असलेले तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीने शेतकऱ्यांसाठी योजना अमलात आणली आहे शेतीमालावर धान्य तारण योजना सुरू केली आहे शेतात पिकवलेला माल योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी घरात ठेवतो मात्र तो पुन्हा खराब होऊ लागतो त्यालाच पर्याय म्हणून तेजस को-ऑपरेटिव्ह बँक ने शेती मालावर धान्य तारण योजना सुरू केली असून यावर वार्षिक व्याजदर केवळ १६ टक्के असणार आहे तेव्हा शेतकऱ्यांनी आपले धान्य ठेवण्यासाठी बँक व्यवस्थापनाशी संपर्क साधावा व या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन चेअरमन एडवोकेट प्रकाश कवठेकर यांनी केले आहे.



**परळी : श्री गणेश जन्मोसत्व निमित्ताने परळी येथील गणेशपार जुने गांव भाग येथे अतिशय पुरातन गणपती मंदिरात जन्मोस्तव सर्व भक्तांच्या उपस्थितीत पार पडला यात सकाळी अमृत समयी श्री चा अभिषेक दुपारी अथर्वशीर्ष सामूहिक वाचन १२ वाजता पुषवृष्टी आरती प्रसाद वाटप करण्यात आले या प्रसंगी मोठया संख्येने भक्त उपस्थितीत होते.**

# आष्टी तहसीलदार पदाचा कार्यभार विनोद रणवरे यांनी स्वीकारला

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील या रजेवर गेल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील भूसुधार विभागातील तहसीलदार श्री विनोद रणवरे यांच्याकडे आष्टी तहसीलदार पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला असून त्यांनी कारभार स्वीकारला आहे.**

आष्टीच्या तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांच्या कार्यपद्धतीला कंटाळून मंडळ अधिकारी आणि तलाठी संघटनेने सामूहिक रजा आंदोलनाचा इशारा जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे दिला होता.

त्यानंतर श्रीमती वैशाली पाटील यांना रजा देण्यात आली असून जिल्हा प्रशासनाने आष्टीच्या तहसीलदार पदी बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील भूसुधार विभागातील तहसीलदार श्री विनोद रणवरे यांच्याकडे आष्टी तहसीलदार पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला असून त्यांनी पदभार स्वीकारला आहे गुरुवारी दुपारी पदभार स्वीकारून त्यांनी लगेचच कामाला सुरुवात केली आहे दि.२६ जानेवारी २०२६ प्रजासत्ताक दिनाची तयारी आणि त्या अनुषंगित कामाबाबत त्यांनी आढावा घेऊन नायब तहसीलदार, अव्वल कारकून आणि तहसील कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख यांचे समवेत आढावा बैठक घेतली तहसील कार्यालयातील अभिलेखा (रेकॉर्ड) विभागा कडील दस्त ऐवज हे डिजिटलायझेशन करण्यात आलेले आहे त्याबाबत तहसील कार्यालयात होणारी गर्दी कमी होण्यासाठी संबंधित अर्जदाराला स्थानिक पातळीवर ऑनलाईन पद्धतीने दस्तऐवज मिळावेत यासाठी आवश्यक उपयोजना करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# सुनीता कुलकर्णी यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



जाणिव प्रतिष्ठान चे जेष्ठ विधीज्ञ मा.अनंतराव कुलकर्णी यांच्या सुविद्य पत्नी सुनीता अनंतराव कुलकर्णी याचं आज दि.२२ जानेवारी २०२६ रोजी गुरुवारी दुपारी ४ वाजता गोविंद नगर चाणक्य पुरी समोर ,बीड येथे राहत्या घरी नुकतंच दुःखद निधन झालं आहे.त्यांचं मृत्यूसमयी ६५ वर्ष वय होत.त्यांच्या पश्चात १ मुलगा,१ मुलगी,नातवंडे असा परिवार आहे.जिल्हा न्यायालयात त्या वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत होत्या. त्यांचा अंत्यविधी दि.२३ जानेवारी शुक्रवारी सकाळी ९ वा.अमरधाम स्मशानभूमी,मोंढा रोड,बीड येथे होणार आहे.

# केज - बीड रोडवर मोटारसायकल अपघातात तरुण गंभीर

केज । प्रतिनिधी

केज - बीड रोडवरील आंबाळाच्या बरडाच्या पुर्वेस असलेल्या पुलाजवळ रस्त्याच्या कडेच्या चार फूट खोल खड्यामध्ये मोटारसायकल पॅशनप्रो २४ १२७५ या क्रमांकाच्या गाडीचा अपघात झालेला असुन धिरज भवर हा तरुण गंभीर जखमी झालेल्या अवस्थेत खड्यामध्ये मौजे जोला येथील सौ आशाताई बाजीराव ढाकणे व बाजीराव नवनाथ ढाकणे यांच्या नजरेस पडला आणि त्यास तातडीने खड्यामधुन बाहेर काढून तात्काळ १०८ या क्रमांकावर फोन करून रुग्णवाहिकेस बोलावून घेत बीड येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले व उपचार सुरू केले असून त्यांच्या नाजूक प्रकृतीचा विचार करता त्याचे कुटुंबीय येताच त्यांनी धिरज भवर या जखमी तरुणांस पुढील उपचारासाठी अहमदनगर येथे हलविले आहे.



धिरज भवर हा तरुण आष्टी तालुक्यातील मौजे हरीनारायण आष्टा येथील रहिवासी असून बुधवारी लातुर ते आष्टी तालुक्यातील मौजे हरीनारायण आष्टा या प्रवासादरम्यान असताना रात्री कधीतरी खड्यामध्ये मोटारसायकल पडल्यामुळे मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होऊन बेसुध होऊन पडलेला होता पण तो कोणाच्याच नजरेस पडला नसल्यामुळे गुरुवारी सकाळी १२ वाजेपर्यंत बेसुध अवस्थेत खड्यामध्ये पडुन होता. सामाजिक कार्यकर्ते बाजीराव नवनाथ ढाकणे व सौ आशाताई बाजीराव ढाकणे हे मौजे जोला येथुन बीड कडे येत असताना त्यांना खड्यामध्ये मोटारसायकल दिसली म्हणून जवळ जाऊन पाहिले तर मोटारसायकल जवळ बेसुध अवस्थेत पडलेला तरुण दिसला त्यांनी खड्यामध्ये उतरुन त्यास बाहेर काढून तात्काळ १०८ या क्रमांकावर फोन करून रुग्णवाहिकेस बोलावून घेत बीड जिल्हा रुग्णालयात दाखल केले आणि उपचार सुरू केले . जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांनी उपचार करत एम आर आय करून पुढील उपचारासाठी अहमदनगर कडे हलवण्यात आले आहे.

# नीट परीक्षेतील घोटाळा आरोपींचा जामीन फेटाळला-ॲड.तेजस नेहरकर

बीड । प्रतिनिधी

नीट परीक्षेत ६०० पेक्षा जास्त गुण मिळवून देऊन एमबीबीएसला प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून ५५ लाख रुपयांची मागणी करणाऱ्या आणि त्यापैकी २२ लाख रुपये उकळणाऱ्या तीन आरोपींचा जामीन अर्ज माननीय न्यायालयाने फेटाळून लावला आहे. तक्रारदाराच्या वतीने ॲड. तेजस नेहरकर यांनी केलेला उत्कृष्ट युक्तिवाद आणि त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलेली फसवणुकीची गंभीर पद्धत यामुळे आरोपींना जामीन मिळवण्यात अपयश आले.



या प्रकरणाची अधिक माहिती अशी की बीड शहरातील स्वराज्य नगर भागातील रहिवासी असलेले प्रकाश तिडके यांच्या मुलीला नीट परीक्षेत उत्तीर्ण करून देण्याचे प्रलोभन आरोपी पंचफुला मधुकर जगताप, मधुकर जगताप आणि उद्धव शंकरराव राऊत (रा. सुभाष रोड, बीड) यांनी दिले होते. "आम्ही घरदारवाले माणसे आहोत, पळून जाणार नाही" असे भासवून त्यांनी तिडके परिवाराचा विश्वास संपादन केला आणि २२ लाख रुपये ॲडव्हान्स ◀◀ पान ३ वर

# श्रेया ठोंगे संगीत विशारद परीक्षेत प्रथम श्रेणीत पास

माजलगाव । प्रतिनिधी:

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयातील माजी पर्यवेक्षक नारायण ठोंगे यांची नात श्रेया संग्राम ठोंगे हिने शास्त्रीय गायन विषयाच्या विशारद पूर्ण परीक्षेत प्रथम श्रेणी प्राप्त केली आहे. श्रेयाचे सांगितीक शिक्षण नादमयी प्राणेश पोरे कुलकर्णी यांच्याकडे सुरू असून तिला प्राणेश पोरे गुरुजींचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असल्याने आज तिने आपल्या गुरुजींचे व परिवाराचे नाव अभिमानाने मोठे केले आहे. तिला मिळालेल्या या यशाने माजलगावकरांचा सुद्धा अभिमान वाढला आहे.



श्रेयाचे प्राथमिक माध्यमिक शिक्षण श्री सिद्धेश्वर विद्यालयात पूर्ण झाले. आता तीचे पुढील पॉलिटेक्निक शिक्षण इगलवूड महाविद्यालयात सुरू आहे. ◀◀ पान ३ वर

# आ.धस यांनी केली प्रगतशील शेतकरी बद्रीनाथ जगताप यांच्या शेतीची सखोल पाहणी

आष्टी । प्रतिनिधी

मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश धस यांनी टाकळशिंग येथे भेट देत गावातील प्रगतशील शेतकऱ्यांच्या शेतीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी व दूध उत्पादकांची सविस्तर बैठक घेऊन आधुनिक शेती, दुग्धव्यवसाय आणि पूरक उद्योगांबाबत मार्गदर्शन केले.





यावेळी आष्टी पंचायत समितीचे सभापती बद्रीनाथ जगताप यांच्या २० एकर क्षेत्रावरील मक्याच्या पिकासह द्राक्षे, डाळींब, आंबा या फळबागे सोबत टाकळशिंग गावातील इतर शेतकऱ्यांच्या मक्याच्या पिकांची पाहणी करण्यात आली. पिकांची वाढ, खत व्यवस्थापन, पाणी नियोजन व उत्पादन खर्च कमी करून अधिक उत्पन्न कसे मिळवता येईल, यावर आमदार धस यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले.

दूध उत्पादकांसाठी आयोजित बैठकीत गाईला ओला व वाळा चारा किती प्रमाणात द्यावा, चाऱ्याचे संतुलन कसे ठेवावे, तसेच मुरगास तयार करण्यासाठी बेलिंग मशीन, हार्वेस्टर मशीन आपल्या भागासाठी उपलब्ध करणार आहेत. शास्त्रीय पद्धत, साठवण व वापर याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. योग्य आहारामुळे दूध उत्पादनात कशी वाढ होते, याचे प्रत्यक्ष उदाहरण देत आमदार धस यांनी मार्गदर्शन केले. ◀◀ पान ३ वर


## ।। उठावना ।।



रामेश्वर, सुरेश, दीपक मुंदडा के पिताजी आसारामजी हरीरामजी मुंदडा का स्वर्गवास दिनांक २१.१.२०२६ बुधवार को हुआ।

जिनका उठावना दिनांक २३ -०१- २०२६ शुक्रवार के दिन दोपहर ०३:०० बजे रखा गया है।

**स्थान:- निजी निवास, बाजार गल्ली, जिम के सामने, तिर्थपुरी।**

**-: शोकाकुल :-**

रमेशलाल, मोहनलाल, मदनलाल, निलेश (बाळू), सागर, गोविंद, गोकुळ, गुलशन, पुष्कर, अगस्त, दर्श एवंम मुंदडा परीवार (भोगलगाववाला)


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पोलिस अंमलदारच एमडी ड्रग्ज चोरी-विक्रीत अडकला

पुणे । प्रतिनिधी

पोलिसांनी विविध छाप्यांमध्ये जप्त केलेले मेफेड्रोन (एमडी) सारख्या भयानक अंमली पदार्थ (ड्रग्ज) विक्रीच्या संशयावरून पुण्याच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पोलिस पथकाने शिरूरच्या गॅरेजचालकाला ताब्यात घेतले. त्याच्याकडे एक किलो ड्रग्ज मिळाले. चौकशीत ड्रग्जचे धागेदोरे अहिल्यानगर एलसीबीपर्यंत येऊन पोचले. एलसीबीत कार्यरत असणाऱ्या पोलिस अंमलदार श्यामसुंदर विश्वनाथ गुजर याला पुणे पोलिसांनी बुधवारी पहाटे बेड्या ठोकल्या. गुजर पोलिसांनी जप्त केलेल्या ड्रग्जची चोरी करून वित असल्याचे तपासात पुढे आले, अशी माहिती पोलिसांनी दिली.



पुणे ग्रामीण एलसीबी व शिरूर पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत शिरूर शहरातील डंबेनाला परिसरातील बाबूरावनगर मोकळ्या मैदानात ड्रग्ज विक्रीसाठी येणाऱ्या गॅरेजचालक शादाब रियाज शेख (वय ४१) याला ताब्यात घेतले. ही कारवाई १८ जानेवारी रोजी करण्यात आली. त्याच्याकडून एक किलो ५२ ग्रॅम ड्रग्ज जप्त करण्यात आले. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चौकशी आरोपी शादाब शेख याचा अहिल्यानगर एलसीबीतील श्यामसुंदर गुजर याच्याशी संबंध असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार बुधवारी पहाटे पुणे एलसीबी व शिरूर पोलिसांनी अहिल्यानगर एलसीबीतील कर्मचारी श्यामसुंदर गुजर याला चौकशीकामी ताब्यात घेतले. चौकशीत त्याने पोलिसांनी कारवाई करून आणलेले ड्रग्जची विक्री केल्याच्या संशयावरून अटक करण्यात आली. त्याची रवानगी पोलिस कोठडीत करण्यात आली आहे.

अहिल्यानगर पोलिसांनी काही दिवसांपूर्वी श्रीरामपूर परिसरात छापेमारी करून २५ किलो ड्रग्ज जप्त केले होते. मुद्देमाल कक्षातून दहा किलो ड्रग्ज एलसीबीतील कर्मचारी श्यामसुंदर गुजर याने चोरल्याचा संशय आहे. त्याने ड्रग्ज चोरून त्या ठिकाणी मैद्यासारखा पदार्थ ठेवल्याचा अंदाज वर्तविला जात आहे.

पोलिस अंमलदार श्यामसुंदर गुजर याने मुद्देमालातील साडेदहा किलो ड्रग्ज चोरून बाहेर काढले. एक किलो अंमली पदार्थ ऋषिकेश चित्तर याला विक्रीसाठी दिले. त्याने ते माऊली शिंदे याला दिले. माऊली शिंदे याने शादाब शेख याच्याकडे दिले. पुणे पोलिसांनी चित्तर याला पकडल्यानंतर पुढची साखळी जुळत गेली. शेवटी पोलिस अंमलदार श्यामसुंदर गुजर याचे नाव पुढे आले.

पोलिस अंमलदार श्यामसुंदर गुजर २००८ मध्ये पोलिसात भरती झाला. तो सुरुवातीला पारनेर पोलिस ठाण्यात कार्यरत होता. तिथेही तो मुद्देमाल कारकून होता. त्यानंतर त्याची तोफखाना पोलिस ठाण्यात बदली झाली. तोफखाना पोलिस ठाण्यातून तत्काळ त्याची एलसीबीमध्ये नियुक्ती करण्यात आली होती.

पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांच्या आदेशानुसार एलसीबी पोलिसांनी शिरूर परिसरात १८ जानेवारीला छापा टाकून शादाब रियाज शेख (वय ४१, गॅरेज चालक) याच्याकडून १ किलो ५२ ग्रॅम एमडी जप्त केले. त्याच्या चौकशीतून पारनेर तालुक्यातील माऊली शिंदे व त्याच्या पंटरची नावे पोलिसांनी समजली. माऊली शिंदेकडून ९ किलो ६५५ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले. चौकशीत शिंदेने हे ड्रग्ज पोलिस कर्मचारी श्यामसुंदर गुजर याच्याकडूनच घेतल्याची कबुली दिली. तांत्रिक तपासातही गुजरचा थेट सहभाग निष्पन्न झाला.

# मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात दिग्विजय पाटील यांचा अटकपूर्व जामीन फेटाळला

पुणे : मुंढवा येथील शासकीय जमीन गैरव्यवहार प्रकरणात 'अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपी' कंपनीचा संचालक दिग्विजय पाटील याचा अटकपूर्व जामीन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. पी. रागीट यांच्या न्यायालयाने फेटाळला. गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळावा, यासाठी पाटील याने सत्र न्यायालयात अर्ज केला होता.




गुन्ह्यात राज्य सरकारची मोठी फसवणूक झाली आहे. आरोपींच्या बँक खात्यांची पडताळणी आणि साक्षीदारांची तपासणी सुरू आहे, असा युक्तिवाद सरकार पक्षातर्फे करण्यात आला, तर अर्जदार आरोपी तपास अधिकाऱ्यासमोर तीनवेळा हजर राहिले असून, त्यांनी तपासात सहकार्य केले आहे. अर्जदार यांनी फिर्यादीची फसवणूक केलेली नसून कोणतेही खोटे व बनावट दस्तऐवज तयार केलेले नाहीत.

अर्जदाराची पोलिस कोठडीतील चौकशीची आवश्यकता नाही, असा युक्तिवाद पाटील यांच्या वकिलांनी केला. न्यायालयाने सरकार पक्षासह बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकून घेत गुन्ह्याचे स्वरूप आणि प्रकरणातील तथ्ये पाहता अर्जदार आरोपी अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर करण्याबाबत अयशस्वी ठरला आहे. या टप्प्यावर आरोपी दिलासा मिळण्यास पात्र नाही, असे नमूद करीत न्यायालयाने पाटीलचा अटकपूर्व जामिनाचा अर्ज फेटाळून लावला.

गुन्ह्यातील मुख्य आरोपी शीतल तेजवानीचा जामीन अर्ज पौड न्यायालयाने यापूर्वीच फेटाळला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार हे भागीदार असलेल्या 'अमेडिया एंटरप्रायझेस' कंपनीने मुंढवा भागातील ४० एकर जमीन अनियमितपणे खरेदी केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. ३०० कोटी रुपयांत या जामिनाचा व्यवहार झाला आहे. याप्रकरणी बावधन पोलिस ठाण्यात तेजवानीसह दिग्विजय पाटील, तत्कालीन सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांच्याविरोधात गुन्हा दाखल आहे.

# ज्येष्ठ दांपत्याची जमीन फसवणूक करून बळकावण्याचा प्रकार उघड; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

पुणे – पुणे जिल्ह्यात सध्या जमिनींचे दर गगनाला भिडले असून पीएमआरडीएच्या रिंग रोडचे काम सुरू असल्याने रिंग रोडलगतच्या जमिनींना मोठे बाजारमूल्य प्राप्त झाले आहे. याच पार्श्वभूमीवर जमिनीच्या व्यवहारांत फसवणुकीचे प्रकार वाढत असल्याचे चित्र समोर येत आहे.

अशाच एका गंभीर प्रकरणात मौजे बहुली, ता. हवेली, जि. पुणे येथील ज्येष्ठ नागरिक दांपत्याची जमीन फसवणुकीने बळकावल्याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मौजे बहुली येथील ज्येष्ठ नागरिक विलास भगत व कमल विलास भगत यांची गावातील वडिलोपार्जित मालकीची शेतजमीन गट क्रमांक ३२८ व ४५४ अशी आहे. या जमिनीपैकी केवळ गट क्रमांक ४५४ मधील १७ गुंठे जमीन खरेदी करण्याचा व्यवहार ठरलेला असताना गावातीलच संतोष भगत व त्याचा साथीदार मयूर मारुती बदगुडे यांनी खोटी माहिती देत फसवणूक केल्याचा आरोप आहे.

आरोपींनी टोकन म्हणून दिलेले ५ लाख रुपये हेच संपूर्ण व्यवहाराचा मोबदला




असल्याचे खरेदीखत दस्तावेजात नमूद करून, कोणतीही स्पष्ट माहिती न देता घाईगडबडीने दुय्यम निबंधक कार्यालयात नेऊन दोन्ही गटांतील जमिनींचा खरेदीखत दस्त नोंदवून घेतल्याचे तपासात समोर आले आहे. विशेष म्हणजे, सदर खरेदीखतामध्ये सरकारी मूल्यांकन देखील केवळ एका जमिनीचे दाखविण्यात आले असून, आरोपींनी संगनमताने शेतकऱ्यांची तसेच शासनाची मुद्रांक शुल्काचीही फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर, विलास भगत यांनी ड. नागेश जेधे व ड. ओंकार चव्हाण यांच्याशी संपर्क साधून घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर वकिलांमार्फत पोलिस उपायुक्तांकडे तक्रार अर्ज दाखल करण्यात आला. तक्रार अर्जातील बाबींची पडताळणी केल्यानंतर त्यामध्ये तथ्य आढळून आल्याने उत्तम नगर पोलिस ठाण्यात आरोपी संतोष भगत व मयूर बदगुडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(५), ३१६(२), ३१८(४) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उत्तम नगर पोलीस करीत असून, वाढत्या जमीन व्यवहारांतील फसवणूक रोखण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# पराभवानंतर रुपाली ठोंबरेंचा ट्रॉलर्सला थेट इशारा; म्हणाल्या, बदनामीकारक पोस्ट, अश्लील कमेंट कराल तर...

पुणे । प्रतिनिधी

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत सर्व पक्षांना मागे टाकत भाजपने स्पष्ट वर्चस्व प्रस्थापित केले आहे. शहरातील मुख्य लढत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात होती. या लढतीत भाजपने ११९ जागांवर विजय मिळवत महापालिकेवर एकहाती सत्ता मिळवली आहे. या पराभवात अजित पवार गटातील अनेक प्रमुख नेत्यांना धक्का बसला आहे. माजी महापौर दत्तात्रय धनकवडे तसेच राष्ट्रवादीच्या माजी प्रवक्त्या रूपाली पाटील ठोंबरे यांचा पराभव झाला आहे. निकालानंतर रूपाली पाटील ठोंबरे यांच्यावर समाजमाध्यमांवर तीव्र टीका सुरू असून, या टीकेविरोधात त्यांनी थेट कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

रूपाली पाटील ठोंबरे यांनी त्यांच्या सोशल मिडीयावरती पोस्ट लिहून याबाबतचा इशारा दिला आहे. रूपाली पाटील ठोंबरे यांनी पोस्टमध्ये म्हटलंय की, सोशल मीडियावर बंधु,भगिनी,वडील मंडळी तसचे पोर्टल, न्यूज चॅनेल वालो माझ्या बाबतीत संदर्भात जाणीवपूर्वक हेतुपरस्पर फेक नेरेटिव पोस्ट, बदनामीकारक पोस्ट, अश्लील कमेंट कृपया करुच नये. वैचारिक मनभेद असतील ,आपण माहिती घेऊन तपासून खात्री करून मगच व्यक्त व्हावे किंवा पोस्ट करावी. आपल्याला संविधानाने मिळालेल्या स्वातंत्र्याचा दुसऱ्यासाठी गैरवापर करून बदनामी, अश्लील कमेंट करू नये. अन्यथा नाहक आपल्यावर कायदेशीर कडक कारवाई करावी लागेल व गुन्हा सुद्धा दाखल करावा लागेल. त्यामुळे माझी विनंती आहे फेक नेरेटिव पसरवणाऱ्या ट्रॉलर्सला माझ्या बाबतीत कोणतीच चुकीच्या बदनामीच्या पोस्ट करू नये. जाणीवपूर्वक गैरसमज करणाऱ्या पोस्ट करू नये, असा कडक इशारा रुपाली पाटील ठोंबरे यांनी दिला आहे.

तर पुढे त्या म्हणाल्या की, मी व माझी सोशल टीम परिवार ट्रॉलर्सला जशास तसे उतर देण्यास समर्थ आहोतच पण त्यासोबत कडक कायदेशीर कारवाई सुद्धा करण्यास तत्पर आहे. त्यामुळे ट्रॉलर्स तो कोणत्याही पक्षाचा, जातीचा, धर्माचा असो संविधानाने, कायद्याने, घटनेने कायदेशीर कारवाईस पात्र राहील. नो फेक नेरेटिव नो बदनामी पोस्ट, नो अश्लील कमेंट्स, नो अब्रुनुकसान नो समाज भावना दुखावणे. हीच जाहीर नोटीस समजावी, असं देखील रुपाली पाटील यांनी म्हटलं आहे.(ठींरिश्रिळ झरींळश्र ढहेलरीश)

दोन प्रभागामधून निवडणूक लढवली पण...

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाकडून रुपाली पाटील यांनी प्रभाग क्रमांक २५ आणि २६ या दोन प्रभागामधून निवडणूक लढवली होती. या दोनही प्रभागातून रुपाली पाटील यांना पराभव स्वीकारावा लागला होता. मतमोजणी दरम्यान त्यांनी निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेत गोंधळ घातला होता. यावरूनच रुपाली पाटील यांच्यावर टीका होत आहे. अशातच आता रुपाली पाटील यांनी त्यांना ट्रोल करणाऱ्या गँगला थेट कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

# जय–पराजय विसरून एकत्र; वाघोलीत जपली राजकीय संस्कृती

वाघोली – वाघोली (तालुका हवेली) येथील पंचायत समिती हवेलीच्या माजी सभापती वसुंधरा शिवदास उबाळे व रत्नमाला संदीप सातव यांच्यात नगरसेवक पदासाठी निवडणूक झाली होती. रत्नमाला सातव या निवडणुकीत विजयी झाल्या



असल्या तरीही वसुंधरा शिवदास उबाळे व रत्नमाला संदीप सातव यांचे कौटुंबिक संबंध असल्याने निवडणुकीतील जय पराजय विसरून एकमेकांना शुभेच्छा दोन्ही कुटुंबीयांनी दिल्या असून याच माणुसकीच्या दर्शनाने राजकीय संस्कृती आज देखील टिकून असल्याचे वाघोली येथे चित्र निर्माण झाले आहे.

वाघोली ग्रामपंचायत कार्यकाळात लोकनियुक्त महिला सरपंच वसुंधरा शिवदास उबाळे व उपसरपंच पदाचा कार्यकाल पूर्ण करणारे संदीप सातव यांनी वाघोलीच्या विकासासाठी सर्व ग्रामपंचायत सदस्यांच्या साथीने विकासाभिमुख कामे केली होती. ग्रामपंचायत निवडणुकीतील गट तट बाजूला ठेवून वाघोली मध्ये विकास कामे मोठ्या प्रमाणात झाली होती. पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप कडून रत्नमाला संदीप सातव तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून वसुंधरा उबाळे यांनी एकमेकांविरोधात निवडणूक लढवली होती. मात्र निवडणुकीतील जय पराजय बाजूला ठेवत विकास कामांसाठी व वाघोली चे वैभव पुन्हा उभारण्यासाठी माजी सभापती वसुंधरा उबाळे यांनी रत्नमाला संदीप सातव यांना शुभेच्छा देत वाघोलीत राजकीय संस्कृतीचे अनोखे दर्शन घडवले आहे. निवडणुकीत विजय संपादन केल्याबद्दल वसुंधरा उबाळे व माजी सरपंच शिवदास उबाळे यांच्या हस्ते सातव परिवाराचा सन्मान करण्यात आला. उबाळे परिवाराचे रत्नमाला संदीप सातव यांनी त्यांचे आशीर्वाद घेऊन वाघोली चा विकास थोरामोठ्यांच्या मार्गदर्शनाखाली करणार असल्याचे सांगितले आहे.

# ज्येष्ठ नागरिक महिलेच्या प्लॉटवर जबरदस्ती ताबा


पुणे । प्रतिनिधी

वडगाव शेरी येथील सर्वे नंबर ५१/१ मधील प्लॉट क्रमांक ५५, ५६ व ६९ यांचा जबरदस्तीने ताबा घेतल्याचा गंभीर आरोप एका ज्येष्ठ नागरिक महिलेने केला आहे. बनावट कागदपत्रांचा वापर करून सदर प्लॉट अवनी रिएल्टर्सकडे कन्व्हेन्स डीड केल्याचा दावा करत संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली होती.

तक्रारदार महिलेच्या म्हणण्यानुसार, सदर प्लॉटचा कायदेशीर ताबा मेसर्स पल्लवी रिअल इस्टेट प्रा. लि.कडे असून त्या कंपनीच्या संचालक आहेत. ८ जानेवारी २०२४ रोजी काही व्यक्तींनी वॉचमनला धमकावून प्लॉटचा ताबा घेतल्याची तक्रार चंदननगर पोलीस ठाण्यात देण्यात आली होती. मात्र, दीर्घकाळ कारवाई न झाल्याने प्रकरण न्यायालयात गेले.न्यायालयाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्यानंतरही पोलिसांनी उशिराने एफआयआर नोंदविल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. अखेर ७ ऑक्टोबर २०२५ रोजी गुन्हा दाखल झाला. या संपूर्ण प्रकरणात फसवणूक, विश्वासघात व गुन्हेगारी कट रचल्याचा आरोप असून, तक्रारदारांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. उच्च न्यायालयाने १७ जानेवारी २०२६ रोजी याचिकेवर सुनावणी घेत आरोपींना समन्स बजावले आहेत.

# सायकल स्पर्धा मार्गावरील शाळा शुक्रवारी दुपारी बारानंतर बंद

पिंपरी : पुणे ग्रॅण्ड चॅलेंज टूर-आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या चौथ्या टप्प्याच्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड शहरातील स्पर्धा मार्गावरील सर्व सरकारी व खासगी शाळा शुक्रवार (दि. २३) दुपारी १२ वाजेपर्यंत सुरू ठेवाव्यात. त्यानंतर शाळा बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.




टप्पा क्रमांक चार शर्यतीस म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल येथून सुरुवात होणार आहे. ती पुणे शहर हद्दीत जावून परत औंध येथील राजीव गांधी पुलमार्गे पिंपरी-चिंचवड शहरात प्रवेश करणार आहे. सांगवी, वाकड, निगडी, त्रिवेणीनगर, भोसरी, चिखली, पिंपरी, काळेवाडी परिसरातून फिरुन परत राजीव गांधी पुलमार्गे पुणे शहरात प्रवेश करणार आहे. स्पर्धा सुरळीत व सुरक्षितपणे पार पडण्यासाठी तसेच, नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी स्पर्धा मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी स्पर्धा मार्गावरील सांगवी, वाकड, रावेत, ताथवडे, पुनावळे, निगडी प्राधिकरण, इंद्रायणीनगर, चिंचवड-एमआयडीसी, चिखली, काळेवाडी, भोसरी-एमआयडीसी, यशवंतनगर पिपरी, त्रिवेणीनगर या परिसरातील सर्व सरकारी व खासगी शाळा दुपारी १२ नंतर बंद करण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# शिरूर शहरात भरवस्तीत बिबट्याचा वावर; वन विभागाची रात्रभर शोधमोहीम

शिरूर : शिरूर शहरातील जोशीवाडी परिसरात मंगळवारी रात्री साडेअकराच्या सुमारास बिबट दिसल्याची माहिती मिळताच वन विभाग शिरूर यंत्रणा तत्काळ सक्रिय झाली. मानवी वस्ती असलेला हा भाग, अरुंद बोळी व दाट घरांमुळे बिबट्याचा ठावठिकाणा निश्चित करणे कठीण ठरत होते. मात्र, वन विभागाच्या रात्रभर चाललेल्या शोधमोहीमेमुळे अखेर सकाळी सहा वाजता बिबट्याला सुरक्षितपणे नदीच्या दिशेने हुसकावण्यात यश आले, त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला.



जोशीवाडी परिसरात बिबट्याच्या हालचालीची बातमी पसरताच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. संभाव्य धोका लक्षात घेऊन वन विभागाने संपूर्ण परिसरात सर्च ऑपरेशन राबविले. वाहनांद्वारे गस्त, सर्चलाईट व टॉर्चच्या सहाय्याने बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात आले. रात्रीच्या अंधारात आणि अरुंद गल्ल्यांमुळे मोहिमेला अडचणी येत असल्या तरी कर्मचारी सतर्कतेने कार्यरत होते.

दरम्यान, बिबट पुन्हा मानवी वस्तीत येऊ नये, यासाठी पांजरपोळ परिसरात एक पिंजरा आधीच लावण्यात आला असून आज आणखी दोन पिंजरे तसेच ट्रॅप कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. याशिवाय परिसराची सखोल पाहणी करण्यासाठी ड्रोनद्वारे निरीक्षण करण्यात येणार असल्याची माहिती वन विभागाने दिली.या शोधमोहीमेत निळकंठ गव्हाणे (वनपरीक्षेत्र अधिकारी, शिरूर) यांच्या नेतृत्वाखाली वनरक्षक गणेश झिरपे, जालिंदर सानप, वनपरीक्षेत्रातील इतर कर्मचारी, बेस कॅम्पचे सदस्य तसेच माणिकडोह येथील डॉ. विसळकर आणि त्यांची टीम सहभागी झाली होती. कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात आली होती.वन विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, बिबट दिसल्यास तात्काळ वन विभागाशी संपर्क साधावा. संध्याकाळी व विशेषतः रात्रीच्या वेळी बाहेर पडताना सावधगिरी बाळगावी. लहान मुलांना रात्री एकटे बाहेर सोडू नये, घरासमोर व परिसरात पुरेसा उजेड ठेवावा तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे. वन विभागाच्या तत्पर कारवाईमुळे मोठी दुर्घटना टळली असून, पुढील काही दिवस शिरूर शहर परिसरावर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.

# श्री गणेशचरणी पाच हजार पुस्तकांचा महानैवेद्य; वाचनसंस्कृतीसाठी अनोखा उपक्रम

पुणे । प्रतिनिधी

चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचे अधिपती असलेल्या श्री गणेशाच्या जन्मसोहळ्यानिमित्त जय गणेश व्यासपीठाच्या माध्यमातून बुधवारी (दि. २१) श्री गणेशचरणी पाच हजार पुस्तकांचा महानैवेद्य दाखविण्यात आला. वाचनसंस्कृती आणि वाचनचळवळ अधिक वृद्धिंगत व्हावी, या उद्देशाने महाप्रसादाच्या रूपाने या पुस्तकांचे वाटप ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केले जाणार आहे. शालेय विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील अशी ही पुस्तके आहेत.



जय गणेश व्यासपीठाच्या माध्यमातून शनिवार पेठेतील नवीन मराठी शाळेत हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. अमर लांडे यांनी श्री गणेशाची रांगोळी काढली. त्याभोवती विद्यार्थ्यांना भेट देण्यासाठीची हजारो पुस्तके आकर्षक पद्धतीने मांडण्यात आली होती. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस, नवनिर्वाचित नगरसेवक कुणाल टिळक, स्वप्नाली पंडित तसेच श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंडळ ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, संदर्भ ग्रांथपाल प्रसाद भडसावळे, शाळेच्या मुख्याध्यापिका हेमा जाधव उपस्थित होते. साईनाथ मंडळ ट्रस्टचे पीयूष शहा यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम झाला. कुणाल पवार, राहुल आलमखाने, नंदू ओव्हाळ, विक्रम गोगावले आदींनी उपक्रमात सहभाग घेतला. सुरुवातीस पुस्तकपूजन करण्यात आले. त्या वेळी विद्यार्थ्यांनी गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया असा गजर केला. शालेय विद्यार्थ्यांनी संपूर्ण अथर्वशीर्षपठण केले.